cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–११० | शुक्रवार दि.१० जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ...की विकासच आपल्या जीवावर उठलाय?

एका विकसित राष्ट्राची ओळख त्याच्या उंच इमारतींनी, सर्वात लांब एक्सप्रेसवेने, सर्वात मोठ्या विमानतळाने किंवा सर्वात वेगवान मेट्रोने होत नाही. त्या देशाची खरी ओळख ठरते ती त्याच्या नागरिकांच्या सुरक्षिततेवर. कारण विकासाचा अर्थ फक्त बांधकाम नसतो; विकासाचा अर्थ विश्वास असतो. पण आज भारतात घडणाऱ्या घटनांकडे पाहिलं, तर मनात एक अस्वस्थ करणारा प्रश्न निर्माण होतो. आपण विकासाचं राष्ट्र उभारत आहोत की अपघातांची वाट पाहणारं राष्ट्र?

# शेतपिकांचा हमीभाव ठरवताना प्रत्यक्ष उत्पादन खर्चाचा विचार; विधानसभेत कृषिमंत्र्याचा खुलासा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात शेतपिकांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) निश्चित करताना शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पादन खर्चाकडे दुर्लक्ष होत असल्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. त्यावर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी हमीभाव निश्चित करताना शेतकऱ्यांना येणारा प्रत्यक्ष उत्पादन खर्च विचारात घेतला जात असल्याचा खुलासा केला.**



नागपूर उत्तरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्याला दिलेल्या लेखी उत्तरात कृषिमंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकार हमीभाव निश्चित करताना खेळते भांडवल, त्यावरील सहा टक्के व्याज, भाडेतत्त्वावरील जमिनीचे भाडे, कौटुंबिक श्रम यांसह विविध घटकांचा समावेश करून उत्पादन खर्चाची परिगणना करते. त्यामुळे प्रत्यक्ष लागवड खर्चाचा विचार केला जातो. राज्य शासनाकडून पाठविण्यात आलेल्या शिफारशींसह इतर राज्ये व केंद्रशासित प्रदेशांकडून प्राप्त झालेल्या माहितीचा तसेच केंद्र सरकारच्या स्वतंत्र यंत्रणेकडून संकलित करण्यात आलेल्या उत्पादन खर्चाच्या आकडेवारीचाही हमीभाव निश्चित करताना आधार घेतला जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एमएसपी निश्चित करताना प्रत्यक्ष उत्पादन खर्च, जमिनीचे भाडे आणि भांडवलावरील खर्च विचारात घेण्याच्या मागणीसाठी राज्यातील तीन शेतकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावर मंत्री भरणे यांनी प्रकाश गोपाळराव पोहरे विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर ही रिट याचिका (क्रमांक ३८४/२०२६) सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून, त्यामध्ये उत्पादन खर्चाची गणना व किमान आधारभूत किंमत रचनेसंदर्भातील विविध मुद्दे उपस्थित करण्यात आल्याचे सांगितले. हे प्रकरण ▶▶ पान २ वर



## फडणवीस केंद्रात, शिंदेंना मुख्यमंत्रिपद !

■ शिवसेनेचे भाजपात विलीनीकरण–पृथ्वीराज चव्हाण

मुंबई । प्रतिनिधी

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या फेरबदलात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्णी लागणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. याविषयी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही भाष्३य केले आहे. फडणवीसांना केंद्रात पाठवून शिंदे गट भाजपात विलीन करायचा आणि एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद द्यायचे, अशी चर्चा ऐकल्याचे ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या दिशेने मोठे पाऊल

■ रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन




मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रात समान नागरी कायदा लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत याबाबत घोषणा करत सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती दिली. या समितीला पुढील सहा महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली असून, त्या अहवालाच्या आधारे नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक सभागृहात मांडण्याचा सरकारचा मानस असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्याच्या २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तज्ज्ञ समिती गठित करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या घोषणेची पूर्तता करत आता समितीची अधिकृत स्थापना करण्यात आली आहे. ही समिती विविध कायदेशीर, सामाजिक, घटनात्मक आणि प्रशासकीय ▶▶ पान २ वर

**हिवाळी अधिवेशनात येणार विधेयक**

राज्य सरकारने समितीला सहा महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याचा अभ्यास करून आवश्यक मसुदा तयार करण्यात येईल. त्यानंतर नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक विधानसभेत आणि विधान परिषदेत मांडण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**गोवा राज्याचा आदर्श**

देशात सध्या गोवा हे एकमेव राज्य आहे, जिथे समान नागरी कायद्याची अंमलबजावणी आहे. गोव्यात सर्व धर्मीय नागरिकांसाठी कौटुंबिक कायद्यांमध्ये एकसमान तरतुदी लागू आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही कायदा लागू करण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे.

## सरकारला प्रश्न विचारले म्हणजे महाराष्ट्राचा अपमान नाही !

### राम मंदिरापासून मिसिंग लिंकपर्यंत मिमिक्री करत राज ठाकरेंचा मुख्यमंत्र्यांना टोला

मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतील पायाभूत सुविधांवरील वाद आणि मिसिंग लिंक प्रकरणाचा उल्लेख करत राज ठाकरे म्हणाले की, लोक विकासकामांतील त्रुटींवर प्रश्न विचारत आहेत. त्याचा अर्थ महाराष्ट्राचा अपमान होत नाही. सरकारच्या कामावर टीका केली की राज्याचा किंवा देशाचा अपमान झाल्याचा दावा करणे चुकीचे आहे. केंद्र सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित केला की देशविरोधी आणि राज्य सरकारवर टीका केली की महाराष्ट्राचा अपमान, ही भूमिका योग्य नाही, असे म्हणत राज ठाकरे यांनी राम मंदिरापासून मिसिंग लिंकपर्यंत मिमिक्री करत मुख्मंत्र्यांवर जोरदार शाब्दीक हल्ला चढविला.



महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेच्या १९ व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विविध मुद्द्यांवरून जोरदार टीका केली. विधानसभेतील मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचा संदर्भ देत, विरोधकांनी सरकारला प्रश्न विचारले की त्याला लगेच राजकारण असे संबोधले जाते, असा आरोप त्यांनी केला. राज ठाकरे म्हणाले की, "आज विरोधक एखाद्या प्रश्नावर बोलले की त्याला राजकारण म्हटले जाते. पण जेव्हा दुसऱ्या पक्षाचे सरकार होते, तेव्हा आंदोलने, टीका आणि प्रश्न उपस्थित करणे हे राजकारण नव्हते का?" राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरील राजकीय प्रचाराचाही उल्लेख केला. गेल्या काही वर्षांत विरोधकांविरोधात अपमानास्पद भाषा वापरणाऱ्या यंत्रणा उभ्या करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. ज्या पद्धतीने विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी वातावरण तयार करण्यात आले, त्याचाच फटका आता सत्ताधाऱ्यांनाही बसत आहे, असा दावा त्यांनी केला. राज ठाकरे यांनी अयोध्येतील राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांचाही उल्लेख केला. श्रद्धाळूंनी दिलेल्या देणगीत गैरव्यवहार झाल्याचा आरोप गंभीर ▶▶ पान २ वर

## गद्दारांना प्रतिष्ठा देऊ नका

### शिंदेंच्या दालनातील पवार–भेटीवरून राऊत संतप्त

मुंबई । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानभवनातील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात भेट देऊन बैठक घेतल्याच्या घटनेवर शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "ज्या गद्दारांनी महाविकास आघाडीचे सरकार पाडले, त्यांच्या दालनात जाऊन बैठक घेणे म्हणजे त्यांना प्रतिष्ठा देण्यासारखे आहे," असा घणाघात राऊत यांनी माध्यमांशी बोलताना केला.**



राऊत म्हणाले, "शरद पवार हे मोठे आणि आदरणीय नेते आहेत. मात्र, बैठक घेण्यासाठी विधानभवनात इतर जागा नव्हत्या का? एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात गद्दारी आणि भ्रष्टाचाराची कीड लावली आहे. अशा व्यक्तीच्या दालनात जाऊन बैठक घेण्याची गरज नव्हती."या घटनेमुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याचा दावा करत त्यांनी सांगितले की, "आम्ही आमच्या पक्षातील गद्दारांविरुद्ध लढत आहोत. अशा वेळी त्यांनाच प्रतिष्ठा देणारे संदेश जाणे योग्य नाही. मग बेईमानीविरोधात बोलण्याचा नैतिक अधिकारही उरत नाही." राऊत यांनी एकनाथ शिंदे यांची तुलना माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख आणि मनोहर जोशी यांच्याशी होऊ शकत नसल्याचे सांगत, "त्यांच्या दालनात जाऊन अशा प्रकारच्या बैठका घेणे आमच्या मनाला वेदना देणारे आहे," असे नमूद केले. महाविकास ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ममता बॅनर्जींना तीनही बँक खाती वापरण्याची परवानगी

कोलकाताः कोलकाता उच्च न्यायालयाने ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसला एक मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने पक्षाच्या दैनंदिन कामांसाठी आणि खर्चांसाठी त्यांच्या तीन बँक खात्यांचा वापर करण्याची परवानगी दिली आहे. नुकतेच ही तीन बँक खात्याचे डेबिट फ्रीज करण्यात आले होते. जरी ममतांच्या पक्षाला बँक खाती वापरण्याची परवानगी दिली असली तरी याचे संचालन न्यायालयाद्वारे नियुक्त एक विशेष अधिकारी याच्यावर कडक नजर ठेवणार आहे. उच्च न्यायालयाच्या जस्टिस सौगत भट्टाचार्य यांच्या पीठानं हा निर्णय दिला आहे. न्यायालयाने पोलिसांकडून एवढ्या गडबडीत बँक खाते सील करण्याच्या कारवाईवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तृणमूल काँग्रेसच्या बँक खात्यातील व्यवहारावर लक्ष ठेवण्यासाठी माजी न्यायाधीश जस्टिस सुब्रत तालुकदार यांची विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### सरसकट कर्जमुक्तीसाठी शेतकऱ्यांचा एल्गार

मुंबईः राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेविरोधात आणि संपूर्ण कर्जमुक्तीच्या मागणीसाठी मुंबईत मंत्रालयाबाहेर एक अत्यंत थरारक आणि अंगावर काटा आणणारे आंदोलन पाहायला मिळाले. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखालील आंदोलकांनी मंत्रालयाबाहेर जोरदार ठिय्या आंदोलन केले. राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही केवळ अटी–शर्तींची असून ती संपूर्णपणे फसवी आहे, असा आरोप करत रविकांत तुपकर यांच्या आक्रमक कार्यकर्त्यांनी मंत्रालयावर धडक दिली. राज्यातील शेतकऱ्यांना कोणत्याही अटींशिवाय विनाअट पूर्ण कर्जमुक्ती मिळाली पाहिजे, अशी प्रमुख मागणी घेऊन हे आंदोलन सुरू झाले होते. आंदोलन तीव्र होताच मंत्रालयाबाहेर तैनात असलेल्या मोठ्या पोलिस बंदोबस्ताने रविकांत तुपकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना बळाचा वापर करून ताब्यात घेण्यास सुरुवात केली.

### हाफकिन महामंडळात कोट्यवधींचा गैरव्यवहार

मुंबईः विधानसभेत हाफकिन महामंडळाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर अर्धा तासाच्या चर्चेद्वारे महामंडळातील आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार आणि प्रशासनातील मनमानी कारभाराकडे राष्ट्रवादीच्या जयंत पाटील यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच कॅगच्या ऑडिट इन्स्पेक्शन रिपोर्टमधील निष्कर्षांचा दाखला देत हाफकिन महामंडळात जनतेच्या पैशांची उधळपट्टी आणि लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप जयंत पाटील यांनी केला. जयंत पाटील म्हणाले की, पोलिओ व्हॅक्सीनसारख्या बालकांच्या जीवाशी संबंधित अत्यंत संवेदनशील लसीच्या वाहतुकीसाठी 'इंडेक्स लॉजिस्टिक्स' या कंपनीला कंत्राट देण्यात आले होते. नियमानुसार पोलिओ लस ४८ तासांच्या आत विमानाने पोहोचवणे आवश्यक असताना ती चक्क रस्तेमार्गे पाठवण्यात आली. मात्र त्यासाठी विमान वाहतुकीचे सुमारे ५० लाख रुपयांचे खोटे आणि बनावट बिल सादर करण्यात आले.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८.५० क्विंटल | २,४७० | २,८६१ | २,६७२ |
| ज्वारी/हायब्रिड : ८५.०० क्विंटल | २,१७० | ५,००० | २,८३५ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | २,२२६ | २,२२६ | २,२२६ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १४.५० क्विंटल | २,२०० | २,९०० | २,५५८ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,२०० | ५,५८० | ५,३९० |

# ज्ञानराधाच्या ठेवीदारांचे पैसे लवकर परत करा!

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा बैठक घेत दिले निर्देश

बीड । प्रतिनिधी

**ज्ञानराधा मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिटदेवेंद्र फडणवीस यांनी विशेष आढावा घेतला. या संस्थेच्या ठेवीदारांचे पैसे विनाविलंब आणि गतीने परत मिळण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया तातडीने राबवावी, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. यासाठी न्यायालयाला विनंती करून अधिसूचना काढण्याची प्रक्रिया वेगवान करण्याचे आदेशही त्यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीचा आढावा घेण्यात आला.



यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे प्रत्यक्ष तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्ञानराधा मल्टीस्टेटची जप्त करण्यात आलेली मालमत्ता आणि त्याचे प्रस्ताव नव्याने तयार करण्यात यावेत. या मालमत्तेचे एखाद्या नामांकित आणि प्रतिथयश संस्थेकडून पुनर्मूल्यांकन करून घ्यावे. हे मूल्यांकन करताना खासगी क्षेत्रातील निकषांप्रमाणे अचूक आणि पारदर्शक पद्धतीने केले जावे, जेणेकरून ठेवीदारांचे पैसे परत देण्याच्या प्रक्रियेला गती येईल. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या एकूण जप्त मालमत्ता २५० स्थावर तर ७४ जंगम, ४० बँक खाती असून एकूण मुल्यांकन १७२.०३ कोटी रुपये आहे. जप्त केलेल्या मालमत्तेच्या लिलावास तातडीने मंजूरी मिळावी यासाठी बीड जिल्ह्यामध्ये स्वतंत्र न्यायालयाचा प्रस्ताव प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी मा.उच्च न्यालयात सादर केला आहे. पोलिस विभागाने जप्त केलेल्या मालमत्तांचे एकूण मुल्य ३९९.०३ कोटी इतके नमुद केले आहे. पोलिस विभागाने सदर मुल्य हे मुद्रांक विभागाच्या चालु वर्षाच्या शीघ्रसिध्द गणक पत्रकानूसार घेतले आहे. ▶▶ पान २ वर

## मॉन्सूनने संपूर्ण देश व्यापला

### कोकण, घाटमाथ्यासह विदर्भात जोरदार पावसाचा इशारा



पुणे । प्रतिनिधी

नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनने ९ जुलै रोजी अरबी समुद्राचा उर्वरित भाग, राजस्थान, हरियाणा आणि पंजाबमधील उर्वरित भागातही प्रगती करत संपूर्ण देश व्यापल्याचे हवामानशास्त्र विभागाने जाहीर केले आहे. कोकण घाटमाथ्यावर पावसाचा जोर ओसरला असला तरी काही भागात जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भातील काही जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता असून, उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी हलक्या सरी हजेरी लाण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.

पुणे घाटमाथा आणि सातारा घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# ...की विकासच आपल्या जीवावर उठलाय?

एका विकसित राष्ट्राची ओळख त्याच्या उंच इमारतींनी, सर्वात लांब एक्सप्रेसवेने, सर्वात मोठ्या विमानतळाने किंवा सर्वात वेगवान मेट्रोने होत नाही. त्या देशाची खरी ओळख ठरते ती त्याच्या नागरिकांच्या सुरक्षिततेवर. कारण विकासाचा अर्थ फक्त बांधकाम नसतो; विकासाचा अर्थ विश्वास असतो. पण आज भारतात घडणाऱ्या घटनांकडे पाहिलं, तर मनात एक अस्वस्थ करणारा प्रश्न निर्माण होतो. आपण विकासाचं राष्ट्र उभारत आहोत की अपघातांची वाट पाहणारं राष्ट्र?

३० ऑक्टोबर २०२२ रोजी गुजरातमधील मोरबी पूल कोसळला आणि शेकडो कुटुंबांचं आयुष्य एका क्षणात उद्ध्वस्त झालं. ४ जून २०२३ रोजी बिहारमधील अगुवानीसुलतानगंज गंगा पुलाचा बांधकामाधीन भाग पुन्हा कोसळला. जून – जुलै २०२४ मध्ये बिहारमध्ये अनेक पूल कोसळल्याच्या घटना समोर आल्या. १५ जून २०२५ रोजी पुणे जिल्ह्यातील कुंडमळा पुलावरील दुर्घटना, ९ जुलै २०२५ रोजी गुजरातमधील गंभीरा पुलाचं कोसळणं, आणि आता जुलै २०२६ मध्ये मोशीतील दुर्घटना, पुणे – लोणावळा घाटातील दरडी आणि मावळमधील भूस्खलन. या प्रत्येक घटनेची कारणं वेगळी असू शकतात आणि काही प्रकरणांमध्ये चौकशी अजूनही सुरू आहे. पण एक गोष्ट समान आहे. प्रत्येक वेळी जीव गमावणारा सामान्य नागरिकच असतो. प्रत्येक दुर्घटनेनंतर आपण जवळजवळ एकच पटकथा पाहतो. घटना घडते. बचावकार्य सुरू होते, चौकशीचे आदेश दिले जातात, नुकसानभरपाई जाहीर होते, काही अधिकाऱ्यांची बदली होते, काहींवर निलंबनाची कारवाई होते, काही दिवस माध्यमांमध्ये चर्चा होते आणि नंतर सगळं शांत होतं. पण काही महिन्यांनी दुसऱ्या राज्यात पुन्हा तशीच दुर्घटना घडते. मग प्रश्न असा पडतो, आपण अपघातांची चौकशी करतो आहोत की अपघातांची पुनरावृत्ती स्वीकारली आहे? आज भारत वेगवान आर्थिक प्रगतीचा दावा करतो. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं स्वप्न दाखवलं जातं. स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेन, एक्सप्रेसवे, मेट्रो, औद्योगिक कॉरिडॉर आणि मेगा प्रकल्पांचा अभिमान बाळगला जातो. पण विकासाची खरी परीक्षा उद्घाटनाच्या दिवशी नसते. ती पहिल्या मुसळधार पावसात होते. जर पहिल्याच मान्सूनमध्ये रस्ते उखडत असतील, पूल धोकादायक ठरत असतील, शहरं पाण्याखाली जात असतील आणि नागरिकांना स्वतःच्या जीवाची चिंता वाटत असेल, तर नागरिकांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. हवामान बदल हा आता भविष्यातील धोका राहिलेला नाही; तो वर्तमानातील वास्तव आहे. अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलन वाढत असल्याचं वैज्ञानिक सातत्याने सांगत आहेत. त्यामुळे प्रश्न असा नाही की पाऊस जास्त का पडतो. प्रश्न असा आहे की आपलं नियोजन अजूनही जुन्या गृहितकांवर का उभं आहे? हवामान बदलाचा विचार करून पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत का? नियमित सुरक्षा लेखापरीक्षण होतं का? दोष आढळल्यास त्यावर वेळेत कारवाई होते का? याचा अर्थ असा नाही की, भारतात झालेलं प्रत्येक बांधकाम निकृष्ट आहे. देशात अनेक उत्कृष्ट महामार्ग, मेट्रो, पूल आणि सार्वजनिक प्रकल्प यशस्वीपणे उभे आहेत. पण जिथे वारंवार दुर्घटना घडतात, तिथे त्या अपवाद म्हणून दुर्लक्षित करणं धोकादायक ठरू शकतं. अशा घटनांमधून शिकून प्रणाली सुधारली नाही, तर पुढची दुर्घटना ही फक्त वेळेचा प्रश्न राहते. लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणं म्हणजे विकासाला विरोध करणं नाही. उलट, विकास अधिक सुरक्षित, अधिक पारदर्शक आणि अधिक उत्तरदायी व्हावा यासाठी प्रश्न विचारणं आवश्यक असतं. करदात्यांच्या पैशातून उभारलेल्या प्रत्येक पुलाचा, प्रत्येक रस्त्याचा आणि प्रत्येक सार्वजनिक इमारतीचा दर्जा विचारण्याचा अधिकार नागरिकांना आहे. सार्वजनिक प्रकल्पांचा स्वतंत्र सुरक्षा अहवाल लोकांसमोर का येऊ नये? नियमित तपासणी बंधनकारक का नसावी? जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक का नसावी? आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपल्याला जगातील सर्वात मोठं इन्फ्रास्ट्रक्चर हवं आहे की, जगातील सर्वात विश्वासार्ह इन्फ्रास्ट्रक्चर.? कारण मोठं बांधणं अवघड असतं, पण सुरक्षित बांधणं त्याहून अवघड असतं. आणि सुरक्षिततेशिवाय विकास हा केवळ आकड्यांचा खेळ ठरतो. शेवटी, विकास हा उद्घाटनांच्या फितींनी मोजला जात नाही; तो नागरिकांच्या विश्वासाने मोजला जातो. कारण इतिहासाला हे लक्षात राहत नाही की किती पूल बांधले गेले. इतिहासाला हे लक्षात राहतं की त्या पुलांवरून किती लोक सुरक्षितपणे आपल्या घरी पोहोचले. आणि जर प्रत्येक मान्सूननंतर भारतातील नागरिकांना हा प्रश्न पडत असेल''आज आपण सुरक्षित घरी पोहोचू का?''तर विकासाच्या मॉडेलकडे पुन्हा गंभीरपणे पाहण्याची वेळ निश्चितच आली आहे.

## आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून ना. सुनेत्रावहिणींच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

# बीडच्या पाणीपुरवठा योजनेचा तिढा सुटणार

## ■ अपूर्ण कामांची चौकशी तर नवीन कामांना मंजुरीचा निर्णय

बीड । प्रतिनिधी

**बीड नगर परिषदेच्या अमृत अभियान अंतर्गत मंजुर पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनेतील कामांसंदर्भात उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्रावहिणी पवार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या बैठकीमुळे बीड शहराच्या पाणीपुरवठा योजनेचा तिढा सुटणार आहे. कामे न करता कोट्यावधी रुपयांची उचल केल्याप्रकरणी कंत्राटदाराची चौकशी करून त्यांना काळ्या यादीत टाकणार, उर्वरित अपूर्ण कामांची नव्याने अंदाजपत्रके तयार करण्याच्या सूचना, महावितरणच्या थकबाकी संदर्भात तडजोडीने मार्ग काढण्याचा निर्णय बैठकीत झाल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. बैठकीला नगरविकास, ऊर्जा, पाणीपुरवठा, महसुल, नियोजन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह नगर परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. आढावा बैठकीमुळे बीड शहराच्या अमृत पाणीपुरवठा योजनेसह भुयारी गटार योजना कार्यान्वित होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.**

बीड नगर परिषदेला अमृत अभियान अंतर्गत सुमारे ११४.६३ कोटी रुपये किंमतीची पाणी पुरवठा योजना तर १६५.८० कोटी रुपयांची भुयारी गटार योजना सन २०१७ मध्ये मंजुर झाली होती. कंत्राटदारांनी अर्धवट कामे केलेली असतानाही त्यांना शेकडो कोटी रुपये संगणमताने अदा करण्यात आले. त्यामुळे ही योजना रखडली होती. आ. विजयसिंह पंडित यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. श्रीमती सुनेत्रावहिणी पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.९ जुलै रोजी विधानभवन येथे उच्चस्तरीय आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला खा. बजरंग सोनवणे, आ. विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी मुजीब शेख, गटनेते फारुक पटेल, स्थायी समिती सदस्य अमर नाईकवाडे, सभापती निजाम शेख यांच्यासह नगरविकास, ऊर्जा, पाणीपुरवठा, महसुल, नियोजन यांसह संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत झालेल्या निर्णयाची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. कामे न करता शेकडो कोटी रुपये शासन निधीची उचल केल्याप्रकरणी कंत्राटदारांची चौकशी करून दोषी कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय या बैठकीत झाला. अपूर्ण कामांचे नव्याने अंदाजपत्रक तयार करून सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणी यांनी दिल्या. ईट जलशुध्दीकरण केंद्र येथील १ मे.वॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे नेट मिटरींग करण्याच्या कामास महावितरणकडून मान्यता मिळाली.



काडीवडगाव व ईट येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या ठिकाणी आवश्यक विद्युत भार उपलब्ध करून देण्याच्या कामासह एक्सप्रेस फिडरने अखंडित व योग्य दाबाने विज पुरवठा करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिणी यांनी दिल्या. महावितरणच्या थकबाकी संदर्भात दंडव्याज माफ करून मुळ देयकातील रक्कमेचे टप्पे पाडणे तसेच ही रक्कम भरण्यासाठी शासन स्तरावरून निधीची उपलब्धता करणे बाबत बैठकीत चर्चा झाली. या बाबतचे सर्व प्रस्ताव दि.१४ जुलै पर्यंत सादर करून नगर विकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांच्या अध्यक्षतेखाली या बाबत बैठक घेण्याचा निर्णय आजच्या बैठकीत झाल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. बैठकी बाबत माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, स्व.अजितदादा पवार साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून बीडच्या जनतेने नगर परिषदेचा कार्यभार आमच्या हाती दिला आहे. त्या विश्वासाला तडा जाणार नाही यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न सुरु आहेत. मागील काळातील भ्रष्टाचारामुळे शेकडो कोटी रुपये निधी मिळूनही शहरातील नागरीकांना सुरळीत पाणीपुरवठा होऊ शकला नाही. तत्कालीन पदाधिकारी आणि कंत्राटदार यांच्या संगणमताने शेकडो कोटी रुपये अक्षरशः पाण्यात वाहून गेले आहेत. या सर्व भ्रष्टाचाराची चौकशी लवकरच होईल असेही त्यांनी सांगितले. बैठकीला उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रावहिणी पवार, खा. बजरंग सोनवणे, आ. विजयसिंह पंडित, नगरविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, उमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव डॉ. राजेश देशमुख, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव अमगोथु श्रीरंगा नायक, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, महावितरणचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी मुजीब शेख, गटनेते फारुक पटेल, स्थायी समिती सदस्य अमर नाईकवाडे, सभापती निजाम शेख, नगरसेवक अशफाक इनामदार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्यासह नगरविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, वित्त व नियोजन, महसुल आदी भागातील वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

## पान १ वरून...

### शेतपिकांचा हमीभाव ठरवताना

सध्या न्यायप्रविष्ट असल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, हंगाम २०२५–२६ मध्ये केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात कडधान्ये व तेलबियांची खरेदी सहकार व पणन विभागामार्फत करण्यात आली असून, त्यामध्ये सोयाबीन, उडीद, तूर आणि हरभरा या पिकांचा समावेश आहे.ङ्कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भारतीय कापूस महामंडळाने (सीसीआय) राज्यात १६८ खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. तसेच नाफेड आणि एनसीसीएफमार्फत खरेदी होणाऱ्या कडधान्यांवरील राज्य शासनाचे शुल्क माफ करण्यात आले आहे. खरेदी प्रक्रियेत अनियमितता टाळण्यासाठी दक्षता पथके स्थापन करण्यात आली असून, प्रधान सचिव (पणन) यांच्या अध्यक्षतेखाली दर सोमवारी हमीभाव योजनेंतर्गत सुरू असलेल्या शेतमाल खरेदीचा नियमित आढावा घेतला जात असल्याची माहितीही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत दिली.

-----------------

### महाराष्ट्रात समान नागरी कायद्याच्या

पैलूंचा सखोल अभ्यास करून राज्यासाठी योग्य असा आराखडा तयार करणार आहे. या सात सदस्यीय समितीत सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, माजी न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव डी. के. जैन, महाराष्ट्राचे महाधिवक्ता ॲड. बिरेंद्र सराफ, पद्मश्री आणि संविधान अभ्यासक रमेश पतंगे तसेच शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुवर्णा रावल यांचा समावेश करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असल्यामुळे समितीचा अहवाल सर्वसमावेशक आणि व्यावहारिक असेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, समान नागरी कायदा म्हणजे धर्म, जात किंवा पंथ यापलीकडे जाऊन सर्व नागरिकांसाठी वैयक्तिक कायद्यांमध्ये समान नियम लागू करणे. सध्या विवाह, घटस्फोट, दत्तक, पोटगी, संपत्तीचा वारसा, कुटुंबीय हक्क यांसारख्या विषयांवर विविध धर्मांनुसार वेगवेगळे वैयक्तिक कायदे लागू आहेत. समान नागरी कायदा लागू झाल्यास या सर्व बाबींमध्ये सर्व नागरिकांसाठी एकसमान कायदेशीर चौकट अस्तित्वात येईल. भारतीय राज्यघटनेतील राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ४४ मध्ये देशात समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, हा विषय दीर्घकाळापासून राजकीय, सामाजिक आणि धार्मिक चर्चेचा केंद्रबिंदू राहिला आहे. विविध राज्यांमध्ये यावर चर्चा सुरू असताना महाराष्ट्र सरकारने समिती स्थापन करून प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू केली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे समान नागरी कायद्याबाबत महाराष्ट्रात व्यापक चर्चा सुरू होण्याची शक्यता असून, आगामी काही महिन्यांत या विषयावर राजकीय आणि सामाजिक पातळीवर महत्त्वपूर्ण घडामोडी घडण्याची चिन्हे आहेत.

-------------

### फडणवीस केंद्रात,

पृथ्वीबाबा म्हणाले. बीबीसी मराठीला दिलेल्या विशेष मुलाखतीत पृथ्वीराज चव्हाण यांना फडणवीसांना दिल्लीत संधी मिळण्याच्या चर्चांबद्दल विचारले असता, ते म्हणाले की, ''खासदार–आमदारांची फोडाफोडी ही वैचारिक आहे का? अगदी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना छातीवर हात ठेवून बोलायला सांगा, की ही वैचारिक आहे की त्यामागे काही आर्थिक विषय आहेत. पन्नास खोके वगैरे. पण त्यामुळे आम्हाला लोकसभेमध्ये फायदा मिळाला.''सरकार टिकवणे, सरकार आणणे सरकार फोडणे, आमदार विकत घेणे, लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत मिळवणे हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अजेंडा आहे, महाराष्ट्र सरकारचा नाही. जे महाराष्ट्रात घडले, ते मोदींच्या आशिर्वादाशिवाय घडू शकले नसते. याला शंभर टक्के मोदी जबाबदार आहेत, असे होऊ शकेल का, की तुमच्या महत्त्वाच्या, मोठ्या राज्यामध्ये काहीतरी घडतेय, तुम्ही पक्षांतरबंदी कायदा पायदळी तुडवता, तुम्ही आमदारांना गुजरातला नेताय, आसामला नेताय, मोदी काय परदेशी दौऱ्यात व्यस्त होते, म्हणून त्यांना माहिती नाही का.? अमित शाह काय करत होते?'' असा प्रश्न पृथ्वीराज चव्हाण यांनी विचारला.''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी हे धोक्याचे आहे, असे मला वाटत नाही, त्यांना ते बदलायचे आहे का, हा त्यांचा विषय आहे. माध्यमांनीच बातम्या दिल्या की दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होणार, कोण खाली जाणार, कोण बाहेर जाणार, बघू आता काय ते असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. आमचे सोर्सेस सांगतात की कोण जाणार, कोणाला डच्चू मिळणार, देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत आणायचे अशी चर्चा आहे, पण मला वाटत नाही ते खरे असेल, कारण शेवटी अडचण अशी की तिथे कोणाला नेमायचे. मी या ऐकलेल्या चर्चा आहेत, गप्पा आहेत, मीडिया गॉसिप आहेत, मला कोणीही अधिकृत सांगितलेले नाही, मी तर असेही ऐकले की, बहुतेक शिंदेंचा गट भाजपमध्ये विलीन करुन त्यांना महाराष्ट्रात मुख्यमंत्री करतील आणि त्यांच्या चिरंजीवांना कॅबिनेट मंत्रिपद देतील, या चर्चा आहेत, मी ऐकतोय फक्त. असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

-----------------

### गद्दारांना प्रतिष्ठा देऊ नका

आघाडीतील घटकांनीही काही राजकीय ''पथ्य'' पाळण्याची गरज असल्याचे सांगत राऊत म्हणाले, ''आम्ही कधीही गद्दारांच्या दालनात जाऊन आमच्या पक्षाची बैठक घेतली नसती. अजित पवार यांनी शरद पवार यांच्याशी बेईमानी केली, हे लक्षात ठेवून आम्ही त्यांच्याही दालनात बैठक घेतली नसती. महाविकास आघाडीतील सर्व घटकांनीही अशीच भूमिका ठेवली पाहिजे.'' राष्ट्रवादी काँग्रेसच्या विश्वसनीयतेवरही या घटनेचा परिणाम झाल्याचा दावा करत, ''शरद पवार यांनी काय करावे हा त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे. मात्र, अशा कृतीमुळे शिवसेना कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत,'' असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

---------------

### सरकारला प्रश्न विचारले म्हणजे

असल्याचे सांगत त्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी केली. राम मंदिराविषयी प्रत्येक हिंदूच्या मनात श्रद्धा आहे. पण श्रद्धेच्या नावावर जमा झालेल्या पैशांबाबत गैरव्यवहाराचे आरोप होत असतील, तर त्यावर प्रश्न विचारणे चुकीचे नाही, असे ते म्हणाले. राज ठाकरे यांनी स्पष्ट केले की, सार्वजनिक पैशांबाबत किंवा धार्मिक संस्थांमधील कथित गैरव्यवहारांवर प्रश्न विचारणे म्हणजे धर्माचा किंवा राज्याचा अपमान नव्हे. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार नागरिकांना आहे आणि त्याला राजकारण किंवा देश–राज्यविरोधी भूमिका ठरवणे योग्य ठरणार नाही. दरम्यान, राज ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---------------

### मॉन्सूनने संपूर्ण देश

ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह वादळी पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात काही ठिकाणी हलक्या सरी हजेरी लावण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. नंदूरबार, धुळे, नाशिक, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, जालना, परभणी, नांदेड, जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलक्या पावसाच्या सरींची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये ढगाळ हवामानामुळे ऊन–सावलीचा खेळ पाहायला मिळण्याची शक्यता आहे. यंदा मॉन्सूनने केरळमध्ये ४ जून रोजी आगमन केले होते. केरळच्या आगमनापासून ३५ दिवस प्रवास करत मॉन्सूनने संपूर्ण देश व्यापला आहे. मॉन्सून सर्वसाधारण ८ जुलै रोजी संपूर्ण देश व्यापतो. परंतु यंदा मॉन्सूनने १ दिवस उशिराने देश कवेत घेतला आहे.

----------

### ज्ञानराधाच्या ठेवीदारांचे पैसे

जप्त मालमत्तांच्या लिलाव करण्यापुर्वी त्यांचे मुल्यांकन व्यावसायिक मुल्यांकन कंपनीद्वारे केले तर मुल्यांकनामध्ये अंदाजे ४ पट वाढ होवू शकते. सुरेश कुटे समुहाने ठेवदारांच्या पैशाचा वापर करुन बँकांची फसवणूक कशी केली याचा प्रवाह ज्ञानराधा सोसायटीचे मुळ निधी ठेवीदार ३९०७६ असून सुरेश कुटे व त्यांचे निकटवर्तीयांना विनातारण व नियबाह्यारित्या कर्जाचे वाटप करण्यात आले. निधीचा वापर कुटे समुहाच्या कंपन्यांमध्ये केला या कंपन्यांनी या मालमत्ता विविध बँकांकडे तारण ठेवून प्रचंड कर्ज उचलले. आणि कर्ज थकीत झाल्यामुळे बँकांकडून एन.सी.एल.टी. प्राधिकरणाकडे दावे दाखल केले आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिली.

-------------



## विवाहास उपस्थित राहून नवनाथ शिराळे यांनी दिले नव वधू वरास आशीर्वाद

बीड । प्रतिनिधी

आज गंगाखेड तालुका जिल्हा परभणी येथील गोदावरी मंगल कार्यालय या ठिकाणी सामाजिक विकास समितीच्या गंगाखेड तालुका अध्यक्षा मुक्ता कराड ताई साहेब यांच्या श्री शुभ विवाह प्रसंगी उपस्थित राहुन त्यांना पुढील विवाहित जीवनासाठी शुभेच्छा देताना भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील सह उपस्थित बीड नगर परिषदेचे माजी नगरसेवक बाबुराव परळकर तसेच माजलगाव या ठिकाणी घोरड परिवाराच्या श्री शुभमंगल विवाह प्रसंगी उपस्थित राहून वधू–वरांना शुभ आशीर्वाद दिले या नंतर हरिभक्त परायण श्री वेदशास्त्र संपन्न श्री श्रीमद भागवत कथाकार हरिभक्त परायण श्री विजय गुरु देव महाराज नाकाडे तरोडेकर व हरिभक्त परायण दिलीप देव नाकाडे तरोडेकर जिल्हा परभणी यांच्या तरोडा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन तरोडा या गावातील प्रसिद्ध असलेले श्री भगवान महारुद्र हनुमान मंदिर या मंदिराच्या ठिकाणी उपस्थित राहून श्री हनुमान महाराजांचे दर्शन व जिल्हा परभणी जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेल्या पोखरणी येथील श्री भगवान नरसिंह यांच्या मंदिरामध्ये जाऊन श्री भगवान नरसिंह यांचे दर्शन घेतले व भगवान श्री नरसिंह यांच्याकडे प्रार्थना केली की सर्वत्र चांगल्या प्रकारे पाऊस पडावा सर्व लोक सुखी आणि आनंदाने नांदावेत अशी मंगलमय प्रार्थना करून श्री भगवान नरसिंहाचे दर्शन घेतले या वेळी उपस्थित असलेले माजी नगरसेवक बाबुराव परळकर पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुकडगावकर तसेच सामाजिक कार्यकर्ते गोविंद भांगे सह इत्यादी सर्व भाविक भक्त मंदिरामध्ये उपस्थित होते.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि–५०८ दिनांक–०८/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती इकरामोद्दीन खमरामोद्दीन सय्यद रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | इकरामोद्दीन खमरामोद्दीन सय्यद | स्वत: | १७/०२/१९९१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/–
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३–२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि–५८५ दिनांक–०८/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती बापुराव नामदेव तांबे रा.शहापुर ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वत: च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | बापु नामदेव तांबे | स्वत: | ०२/०२/१९५४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/–
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/१०९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :– ०९/०६/२०२६

**नांव बदलण्याचा जाहिरनामा**

**जाहिरनामा**

अर्जदार श्री.सौ.श्रीमती : पद्माबाई पि.मारोती सोनवणे

प्रकरण : सिटी सर्वे नं.प.घर नं.५–२५६ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(५–२५६) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नाव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी ह्या जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

चतु:सिमा
पुर्व : डोंगरसिंग चिमचीचे घर
पश्चिम : सुदाम बंसीचे घर
दक्षिण : गोपीनाथ डिगजीचे घर
उत्तर : बाबू रोहिदास यांची जागा

स्वाक्षरित/–
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड



## गुरु आनंद महिला प्रतिष्ठान आयोजित दिंद्रुड जि.प.कें.प्रा. शाळेत शालेय साहित्य वाटप

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबई च्या सहकार्याने विद्यार्थी-विद्यार्थ्यांना वह्या, पाटी, पेन्सिल आदी शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार बालासाहेब फपाळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश काशिद, पत्रकार संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नागेश वकरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात मुख्याध्यापक मनोहर कटारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सिद्धेश्वर बोकन यांनी प्रास्ताविक केले. शालेय व्य. समिती अध्यक्ष नागेश वकरे, पत्रकार संतोष स्वामी, संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त केले. ह भ प हरिदास महाराज सोळंके, सीनियर पत्रकार प्रकाश काशीद, जेष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर, पत्रकार बालासाहेब फपाळ या मान्यवरांची खेळीमेळीत समायोचित भाषणे झाली. भाषणामध्ये पत्रकार मान्यवरांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठान, प्रयास फाउंडेशन व प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.सीमा मनोज ओस्तवाल यांच्या सामाजिक कार्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी सहशिक्षक हरिदास सोळंके, पांडुरंग वाकसे,धनशेट्टी, श्रीमती फपाळ, फुलमाळी, शिंदे यांची उपस्थिती होती.

## भादलीच्या शेतकरी कन्येची एनआयएफटी कांगडा येथे क्सेसरी डिझाईनसाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

भादली येथील शेतकरी कुटुंबातील कु. हर्षदा हनुमान गिरी हिने राष्ट्रीय स्तरावरील निफ्ट (छखऋढ) प्रवेश परीक्षेत यश मिळवत हिमाचल प्रदेशातील कांगडा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (छखऋढ) येथे बी.डिझाईन (क्सेसरी डिझाईन) अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला आहे.



कु. हर्षदा हिने फेब्रुवारी २०२६ मध्ये सुंदरराव सोलंके महाविद्यालय, माजलगाव येथून इयत्ता १२ वी विज्ञान शाखेची परीक्षा ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण केली. त्यानंतर तिने निफ्ट प्रवेश परीक्षेत यश संपादन करून देशातील प्रतिष्ठित फॅशन शिक्षण संस्थेत प्रवेश मिळविला. विशेष म्हणजे, सुंदरराव सोलंके महाविद्यालय, माजलगाव येथून निफ्टमध्ये प्रवेश मिळविणारी ती पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एका गौरवशाली यशाची नोंद झाली आहे. कु. हर्षदा या प्रा. गिरी सर यांच्या पुतणी असून, शेतकरी कुटुंबातील प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत तिने हे यश संपादन केले आहे. तिची ही कामगिरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार तथा संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाशदादा सोलंके, मा. सचिव सतीशभाऊ चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच माजी विद्यार्थ्यांनी कु. हर्षदा हनुमान गिरी हिचे मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ग्रामसेवकाविरुद्ध चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्याचे तहसीलदारांचे आदेश!

**गट विकास अधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहिती न दिल्याचा आरोप; सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांच्या पाठपुराव्याला यश!**

पाटोदा । प्रतिनिधी

कुसळंब ग्रामपंचायतीतील ग्रामसभा प्रक्रिया, माहितीचा अधिकार आणि ग्रामपंचायत प्रशासनातील पारदर्शकतेच्या मुद्द्यावर सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल प्रशासनाने घेतली असून, संबंधित ग्रामसेवकाविरुद्ध चौकशी करून आवश्यक शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश तहसीलदार, पाटोदा यांनी दिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांनी दि. २५ मे २०२६ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत ग्रामसभेची पूर्वसूचना न देणे, ग्रामसभेची माहिती ग्रामस्थांना उपलब्ध न करून देणे, ग्रामसभा इतिवृत्त, उपस्थिती यादी, मंजूर ठरावांच्या प्रती व इतर कागदपत्रे न देणे अशा गंभीर स्वरूपाच्या बाबी मांडण्यात आल्या होत्या.

या तक्रारीची दखल घेत तत्कालीन गट विकास अधिकारी यू. एन. सानप यांनी दि. ०८ जून २०२६ रोजी संबंधित ग्रामसेवकाला लेखी आदेश देऊन महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व नियमांनुसार ग्रामसभा पारदर्शक पद्धतीने घेणे, आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे तसेच अर्जदाराने मागितलेली कागदपत्रे देण्याबाबत निर्देश दिले होते.

मात्र, या आदेशानंतरही संबंधित ग्रामसेवकाने आदेशाचे पालन न करता मागितलेली माहिती उपलब्ध करून दिली नसल्याचा आरोप अतुल शेलार यांनी केला. त्यामुळे त्यांनी दि. २९ जून २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या प्रती तहसीलदार पाटोदा तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा यांनाही पाठविण्यात आल्या.

या तक्रारीची दखल घेत दि. ०१ जुलै २०२६ रोजी तहसीलदार, पाटोदा यांनी गट विकास अधिकाऱ्यांना पत्र पाठवून संबंधित ग्रामसेवकाविरुद्ध चौकशी करून नियमांनुसार आवश्यक शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदारास देऊन त्याची प्रत तहसील कार्यालयात सादर करण्यासही सांगितले आहे.

तहसीलदारांच्या या आदेशामुळे कुसळंब ग्रामपंचायतीतील ग्रामसभा प्रक्रिया, माहितीची पारदर्शकता आणि प्रशासनातील उत्तरदायित्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पुढील चौकशीत नेमकी कोणती तथ्ये समोर येतात याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

**न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो - अतुल शेलार**

याबाबत प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांच्या न्याय व हक्कांसाठी मी सातत्याने संघर्ष करत आलो आहे. माझ्या तक्रारीची प्रशासनाने दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले, ही लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास दृढ करणारी बाब आहे. चौकशी निष्पक्ष होऊन दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा आहे. माझ्याकडे उपलब्ध असलेले पुरावे संबंधित सक्षम प्राधिकरणासमोर सादर करणार असून, ग्रामपंचायतीतील कथित अनियमिततेची सखोल चौकशी व्हावी, अशी माझी मागणी आहे.

## आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

# व्हीबी-जी-रामजी नव्या रोजगार हमी योजनेत ग्रामपंचायतींच्या २० कामांवरील अट शिथिल

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील रोजगार, विकास आणि ग्रामपंचायतींच्या कामांना मोठी चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. व्हीबी-जी-रामजी (विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी मिशन ग्रामीण) या नव्या रोजगार हमी योजनेत वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या कामांवरील अटी शिथिल करण्यात आल्या असून ग्रामीण कुटुंबांना वर्षाकाठी शंभर दिवसांऐवजी एकशे पंचवीस दिवस अकुशल रोजगाराची कायदेशीर हमी देण्यात आली आहे. या निर्णयासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांनी विधिमंडळात सातत्याने आवाज उठवत प्रभावी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने ग्रामीण भागात समाधान व्यक्त होत आहे.



ग्रामीण भागातील अनेक विकासकामे विविध नियम व अटींमुळे रखडत असल्याची बाब आमदार सुरेश आण्णा धस यांनी विधिमंडळात ठामपणे मांडली होती. ग्रामपंचायतींना अधिक स्वातंत्र्य मिळावे, रोजगार हमीची कामे वेगाने सुरू व्हावीत आणि शेतकरी, शेतमजूर तसेच सर्वसामान्य ग्रामीण कुटुंबांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी त्यांनी सातत्याने केंद्र व राज्य शासन स्तरावर पाठपुरावा केला होता.

या पाठपुराव्याची दखल घेत केंद्र शासनाने व्हीबी-ग्राम-जी योजनेअंतर्गत महत्त्वपूर्ण बदल करत वैयक्तिक व सार्वजनिक कामांवरील अटी शिथिल केल्या आहेत.तसेच ग्रामीण कुटुंबांना मिळणाऱ्या रोजगाराच्या दिवसांमध्ये वाढ करून शंभर दिवसांवरून एकशे पंचवीस दिवसांची कायदेशीर हमी देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींना विकासकामे राबविताना अधिक सुलभता मिळणार असून जलसंधारण, मृदसंधारण, वृक्षलागवड, ग्रामीण रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि रोजगारनिर्मितीची विविध कामे अधिक वेगाने पूर्ण होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील ग्रामपंचायतींना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण विकासाला नवी गती मिळणार आहे. रोजगाराच्या वाढीव संधीमुळे हजारो ग्रामीण कुटुंबांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ मिळणार असून, आमदार सुरेश आण्णा धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे महत्त्वपूर्ण यश मानले जात असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

## पान ६ वरुन...

### माजी नगरसेवक

शेड करून देण्याचे आश्वासन बाळराजे पवार यांनी दिले.उद्घाघाटन प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार अय्युब बागवान,भाजपचे नेते बाळासाहेब सानप,नगरसेवक अकीफ काझी,बाबू भाई, माजीद मोईन,असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. तय्यब नगर जोडून शिक्षक कॉलनी येथील रहिवासींना बस मध्ये प्रवास करण्यासाठी तय्यब नगरच्या चौकात बीड जालना हायवेवर राज्य परिवहन महामंडळ च्या बसेस साठी थांबा व्हावा अशी मागणी या भागातील नागरिकांची होती या भागातील नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी पुढाकार घेऊन डेपो मॅनेजरला निवेदन दिले त्यांच्याशी चर्चा केली त्यांनी हिरवा कंदील दाखवल्यानंतर एजाज हे बीड येथील नियंत्रण विभागाचे अधिकारी यांना भेटले आणि त्यांनी तय्यब नगर भागातील लोकांसाठी एसटी बसचा थांबा द्यावा अशी मागणी केली त्यांच्या मागणीला यश आले असून आता सर्व एसटी बसेस इथे थांबतील आणि प्रवाशांची चड उतार होईल या बस थांबा मुळे या भागातील नागरिकांची मोठी सोय झाली असल्याने तय्यब नगर शिक्षक कॉलनी मध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

### गेवराई तालुक्यात पंधरा वर्षीय

शिक्षणासाठी जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय बीड, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा सत्र न्यायालय बीड, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय बीड अथवा राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड यांच्याशी संपर्क साधावा व आपल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणावे जेणेकरून ऊस तोडणी व इतर कारणांसाठी स्थलांतर,एकलपालक, व्यसनाधीनता,गरीबी अथवा इतर कारणामुळे कोणत्याही बालिकेचा बालविवाह होणार नाही याची दक्षता सर्व नागरिकांनी घ्यावी

सदरील बालविवाह थांबवण्यासाठी निंबाळकर विनोद ग्रामविकास अधिकारी सावरगाव विजय परजणे पोलीस हेडकॉन्स्टेबल संजय गुजर पोलीस हेडकॉन्स्टेबल माधव मोही पोलीस चौकी अभिमान मिसळ ग्रामपंचायत सदस्य जनार्धन नागरगोजे ग्रामपंचायत कर्मचारी बाल हक्क कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे आधी उपस्थित होते.

### बीड शहरासहित जिल्ह्यातील

कोणत्याही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले जाणार नाही, यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी, तसेच नागरिकांना योग्य मार्गदर्शन करावे, असे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना नेहमीच लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी काम करत आली असून, मतदार यादी अचूक करण्याच्या या प्रक्रियेतही पक्षाचे पदाधिकारी व शिवसैनिक सक्रियपणे सहभागी होऊन नागरिकांना सहकार्य करतील, असे सचिन मुळूक म्हणाले.

### एसआयआर-बीएलओ कामाच्या

आले आहे. या पार्श्वभूमीवर एसआयआर व बीएलओचे काम अधिक सुलभ, अचूक आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी खाजगी शैक्षणिक संस्थांतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी किंवा इतर शासकीय विभागातील सक्षम कर्मचाऱ्यांची सहाय्यक म्हणून नियुक्ती करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच शिक्षकांना सहकार्याची भूमिका घेवून मार्गदर्शन करण्यात यावे आणि त्यांच्यावर कोणत्याही प्रकारच्या अन्यायकारक कायदेशीर कारवाई किंवा गुन्हे दाखल करण्याच्या रोजच्या धमक्या तात्काळ थांबवाव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. परवा मंगळवारी दुपारी तालुक्यातील उपळी याठिकाणी हे काम करत असतांना तणावाने एक शिक्षक कर्मचारी अक्षरशः जागीच बेशुध्द होवून पडला. नशीब वेळीच उपचार भेटल्यानंतर आता त्यांची प्रकृती स्थिर आहे. परंतू जर अशीच स्थिती राहिली व एखाद्याचे काही बरेवाईट झाले तर याची जबाबदारी कोणावर असेल?, याला संबंधित यंत्रणाचा सर्वस्वी जबाबदार राहील. या लेखी निवेदनावर शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष निलेश चव्हाण सर, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन सुनिल मुंडे सर, संचालक रोहिदास चव्हाण सर यांच्यासह वंजारे सर, आडे सर, सावंत सर, लिंगस्कर सर, चिभडे सर, शेख सर, डोंगरे सर, धाईतिडक सर, शिंपले सर, चव्हाण सर, माने सर, शिंदे सर, टिकुळे सर, दत्तात्रय टिपरे सर तसेच तालुक्यातील उपस्थित शिक्षक बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान सादर करण्यात आलेल्या या मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेवून शिक्षकांवरील अतिरीक्त ताण कमी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे.

# डॉ.आहाद मजीद शेख यांनी एमबीबीएस पदवी केली संपादन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नायगाव येथील भूमिपुत्र तथा सध्या बालेपीर, बीड येथे वास्तव्यास असलेले डॉ. आहाद मजीद शेख यांनी किर्गिज़स्तान या देशातून वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठेची एमबीबीएस (चइइड) पदवी यशस्वीरित्या संपादन करून आपल्या कुटुंबासह तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय यशानिमित्त वडील जिल्हा विस्तार अधिकारी शेख माजीद यांच्या बालेपीर, बीड येथील निवासस्थानी कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवाराच्या उपस्थितीत डॉ. आहाद शेख यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



**पाटोदा-नायगावच्या भूमिपुत्राची वैद्यकीय क्षेत्रात मोठी भरारी**

तसेच त्यांच्या उज्ज्वल वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी अब्दुल कादर (जमाते आमिर, नायगाव), शेख जफर, शेख अजीम, शेख साजीद, पत्रकार हमीदखान पठाण, शेख अजीम सर, शेख अनस आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. आहाद शेख यांच्या यशाबद्दल नायगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली दैठण येथील युवकांचा भाजपात प्रवेश

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे दैठण येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. युवानेते रोहित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे स्वागत केले आहे.



तुमची आमची भाजपा सर्वांची भाजपा म्हणत दैठण येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा कार्यकर्ते माऊली पंडित, बळीराम पंडित, कृष्णा पंडित, सुदर्शन गायकवाड, महेश देशमुख आणि दीपक पंडित यांनी आपल्या सहकाऱ्यांसह माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी युवा नेते रोहित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे सत्कार करून, भारतीय जनता पार्टीमध्ये स्वागत केले. गावाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली यापुढे काम करणार आहोत. प्रत्येकाच्या अडीअडचणीला ते सतत धावून येतात अशा खंबीर नेतृत्वाची सामान्यांना गरज असल्याच्या भावना, भाजपात प्रवेश केलेल्या या तरुणांनी व्यक्त केल्या. कोणतीही अडचण आली तर तिथेच आमच्यापर्यंत पोहोचवा ती सोडवण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाही यावेळी रोहित पंडित आणि यशराज पंडित यांनी दिली. याप्रसंगी शरद पंडित, जगदीश पंडित, विश्वराज पंडित, सुशील जामकर, सचिन पंडित आणि सह ग्रामस्थ आणि भाजपा कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-८३२ दिनांक-०८/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती पांडुरंग भाऊसिंग राठोड रा.पिठोरी सिरसगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या नाती च्या नामे शिवतेज अक्षय पवार, रा.पिंपरखेड खुर्द याचा जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | शिवतेज अक्षय पवार | नाती | २९/०३/२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-७७९ दिनांक-०३/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती गणेश भानुदास डांगे रा.लोणार भायगाव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | शिवराज गणेश डांगे | मुलगा | ०८/१२/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- / /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५६५ दिनांक-२३/०६/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती पूजा कृष्णा कोल्हे रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | वंश कृष्णा कोल्हे | मुलगा | ०२/०३/२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २३/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-५१३ दिनांक-०८/०७/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती वंदना राजू मंजुळकर रा.अंबड ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | युवराज राजु मंजुळकर | मुलगा | १६/०९/२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

# वनहक्क जमिनींना आता स्वतंत्र सातबारा

## अधिवेशनादरम्यान सरकारकडून धोरण जाहीर

मुंबई / प्रतिनिधी

राज्यातील आदिवासी आणि पारंपरिक वननिवासींना वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर आता स्वतंत्र सातबारा उतारा आणि गाव नमुना १२ ई लागू करण्यात आला आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील दोन लाखांपेक्षा जास्त आदिवासी कुटुंबांच्या हक्काचा मार्ग मोकळा झाला आहे.



बावनकुळे म्हणाले, की आतापर्यंत वनपट्टा मंजूर झाल्यानंतर आदिवासी बांधवांची नावे सातबारा उताऱ्यावरील केवळ इतर हक्क या सदरात नोंदवली जात होती, तर मुख्य मालकी हक्काच्या जागी महाराष्ट्र शासन वने असा उल्लेख असायचा. या तांत्रिक अडचणीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना शेतकरी क्रमांक (फार्मर आयडी), बँकांकडून कृषी पीककर्ज, कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यात अडचणी येत होत्या. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नुकसानभरपाई मिळविण्यात अडचणी येत होत्या. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीच्या शिफारशीनुसार सरकारने विशेष बाब म्हणून वनपट्टाधारकांसाठी स्वतंत्र सातबारा नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ई तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार गाव नमुना ७ ई मध्ये थेट संबंधित वनपट्टाधारकाची नोंद केली जाईल. गाव नमुना १२ ई मध्ये संबंधित जमिनीवरील पिकांची नोंद घेतली जाईल. या नवीन निर्णयामुळे आदिवासी शेतकऱ्यांना अॅग्रीस्टॅकसह सर्व कृषिविषयक शासकीय सुविधांचा लाभ अधिक सुलभतेने आणि तातडीने घेता येणार आहे. ज्या भागांत वनपट्टे वन ब्लॉक क्षेत्रामध्ये देण्यात आले आहेत, त्या ठिकाणी भूमी अभिलेख विभागातर्फे तातडीने सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. हे सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यानंतर तातडीने स्वतंत्र सातबारा नमुना ७ ई आणि गाव नमुना १२ ई मध्ये त्यांच्या जमिनीची अधिकृत नोंद केली जाईल, अशी माहिती महसूलमंत्र्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्या मागणीवर दिली. हा निर्णय तळागाळातील शेवटच्या आदिवासी बांधवापर्यंत पोहोचविण्यासाठी महसूलमंत्र्यांनी सभागृहातील सर्व लोकप्रतिनिधींना आवाहन केले.

# रुंद वरंबा व सरी पद्धतीने पिकांची लागवड केल्यास होतो फायदा



यंदा पावसाळा हा कमी प्रमाणात असेल असे म्हटले जाते. असे असताना मान्सून देखील उशिरा दाखल झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अशात पावसाचे प्रमाण, तीव्रता आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन लागवड रुंद वरंबा सरी पद्धतीने केल्यास फायदेशीर ठरते. रुंद वरंबा व सरी पद्धतीमुळे पावसाचे पाणी मुरते. यामुळे पिकांना कमी पाणी लागते. मुलस्थानी जलसंवर्धन होऊन त्याचा उभ्या पिकास तसेच पुढील हंगामातील पिकास लाभ होतो.

हे यंत्र सोयाबीन, तूर, भुईमूग, ज्वारी, बाजरी, उडीद इत्यादी पिकांच्या टोकण पद्धतीने पेरणीसाठी उपयुक्त आहे. यंत्राच्या सांगाड्यावर दोन्ही बाजूला सरी यंत्र असल्यामुळे पडलेल्या सरींमुळे पाण्याचे संवर्धन आणि निचरा होतो. रुंद वरंबा सरी यंत्रामुळे रुंद वरंबा सरी यंत्राद्वारे केलेल्या पेरणीत व पारंपारिक पद्धतीपेक्षा ओलावा जास्त काळ टिकतो. उत्पादनामध्ये पारंपारिक पद्धतीपेक्षा १५ ते २० टक्क्यांनी वाढ होते. पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा सरीद्वारे निचरा होतो. तसेच योग्य प्रमाणात पडलेल्या पाऊस जमिनीत मुरतो. पेरणीचा वेळ वाचतो. यामुळे हे फायदेशीर आहे. यासाठी टोकण यंत्राच्या साहाय्याने आपण चार ओळीतील एक सरी याप्रमाणे पेरणी करतो. त्यासाठी ट्रॅक्टर चालविण्याच्या विविध पद्धतीचा वापर करता येतो. यंत्राच्या रुंदीनुसार ट्रॅक्टरच्या मागील आणि पुढील दोन चाकातील अंतर मोजून घ्यावे. त्याप्रमाणे त्यात बदल करावा. दोन सऱ्यांमध्ये एक १.२ ते १.५ मीटर रुंदीचा वरंबा तयार होतो. त्यावर टोकण यंत्राच्या साहाय्याने एकाच वेळी खत आणि बियाणे पेरता येते.

# काळा मुळा लागवडीतून मिळते बंपर कमाई

मुळा आपल्या शरीराला अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. हे पोट आणि हृदयासाठी सर्वोत्तम मानले जाते. आत्तापर्यंत देशातील बहुतेक लोकांनी पांढरा मुळा पाहिला असेल किंवा खाल्ला असेल. जवळजवळ सर्व घरांमध्ये याचा वापर केला जातो. सॅलड आणि पराठ्यापासून खाण्यापिण्यापर्यंत अनेक गोष्टींमध्ये मुळा मिसळला जातो. पण आता काळ्या मुळ्याचीही मोठ्या प्रमाणात लागवड सुरू झाली आहे. अनेक शेतकरी याच्या लागवडीतून भरघोस कमाई करत आहेत. काळ्या मुळ्याची लागवड वेगळ्या पद्धतीने केली जात नाही, पांढऱ्या मुळ्याच्या लागवडीप्रमाणेच याचीही तीच प्रक्रिया असून, फक्त रंगाचा फरक आहे. ते पूर्णपणे काळे आणि दिसायला सलगम सारखे असते. मात्र, हा मुळाही आतून पांढरा असतो. तसे, शेतकरी वर्षभर काळ्या मुळ्याची लागवड करतात. मात्र यासाठी थंडीचा काळ सर्वोत्तम मानला जातो. हा मुळा बहुतेक लोक हिवाळ्यातच



पिकवतात. त्याच वेळी, त्याची चाचणी देखील पांढरा मुळा पासून पूर्णपणे भिन्न आहे. त्यात अनेक पोषक घटक आढळतात. त्यामुळे काळ्या मुळ्याला भारताबरोबरच परदेशातही खूप मागणी आहे.

लागवड खर्च व उत्पन्न : एका एकरात काळ्या मुळ्याची लागवड करण्यासाठी सुमारे ४० हजार रुपये खर्च येतो. पेरणीनंतर मुळा तयार होण्यासाठी किमान १२० दिवस लागतात. त्याचबरोबर त्यात ८० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. यानंतर बाजारात पांढऱ्या मुळा पेक्षा काळा मुळा महागात विकला जातो. १००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत त्याची विक्री होते. यावरून यातून किती कमाई होऊ शकते याचा अंदाज बांधता येतो. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगडसह देशातील अनेक राज्यांमध्ये आजकाल शेतकरी मोठ्या प्रमाणावर काळ्या मुळ्याचे उत्पादन घेत आहेत. यामुळे वर्षभरात त्याची चांगली कमाई होत आहे.

# शेतात शंखी गोगलगायी होण्यापुर्वीच करा नियंत्रण

पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील शंखी गोगलगायी बाहेर पडताना दिसत आहेत. त्यामुळे सोयाबीन, कापूस, भाजीपाला पिके तसेच फळबागांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. कोवळ्या रोपांच्या तसेच पानांच्या अवस्थेत या गोगलगायींचा प्रादुर्भाव अधिक नुकसानकारक ठरतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी सतर्क राहून वेळीच लक्ष देऊन सामूहिकरीत्या एकात्मिक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल.



शंखी गोगलगायींची जीवनशैली व प्रादुर्भाव : शंखी गोगलगायी प्रामुख्याने रात्री किंवा पहाटे सक्रिय असतात. दिवसा त्या दगडाखाली, पिकांच्या अवशेषाखाली, तणामध्ये, गोणपाटाखाली तसेच इतर ओलसर व सावलीच्या ठिकाणी आश्रय घेतात. सतत ढगाळ वातावरण, जास्त आर्द्रता आणि शेतामध्ये पाणी साचून राहिल्यास त्यांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो. त्यामुळे सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा शेताची पाहणी करून नियंत्रणाच्या उपाययोजना केल्यास त्या अधिक प्रभावी ठरतात.

प्रादुर्भावाची लक्षणे : कोवळी पाने कुरतडलेली दिसणे. नव्याने उगवलेली रोपे रात्रीच्या वेळी खाल्ली जाणे किंवा कापल्यासारखी दिसणे. पानांवर, खोडावर व जमिनीवर चिकट श्लेष्माचा (चमकदार) माग दिसणे. शेतात किंवा बागेत मोठ्या प्रमाणात शंखी गोगलगायी व त्यांची अंडी आढळणे. वरीलपैकी एक किंवा अधिक लक्षणे आढळल्यास विलंब न करता पुढीलप्रमाणे एकात्मिक व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात.

हाताने गोळा करून नष्ट करणे : सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील.

सुरक्षित हाताळणी करावी : गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे.

सापळ्यांचा वापर करावा : शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिकठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी.

शेताची स्वच्छता राखावी : शेतातील तण, पिकांचे अवशेष, दगड, लाकडाचे तुकडे, रिकामे पोते, प्लास्टिक अथवा इतर ओलसर कचरा यामध्ये शंखी गोगलगायी आश्रय घेतात. त्यामुळे अशी ठिकाणे नियमित स्वच्छ ठेवावीत. तसेच शेतामध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.

आमिषाद्वारे आकर्षित करून नियंत्रण करावे : गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी शेतात ठिकठिकाणी गोणपाट ओले करून त्यावर पत्ताकोबी अथवा पपईची पाने बारीक करून ठेवावीत, त्याकडे आकर्षित होऊन जमा झालेल्या गोगलगायींवर तंबाखूचा अर्क ५ लिटर (२५० ग्रॅम तंबाखू भुकटी ७.५ लिटर पाण्यात उकळून ५ लिटर तयार झालेले द्रावण) + कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद द्रावण ५ लिटर (३०० ग्रॅम कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात) असे एकूण १० लिटर द्रावण फवारावे, त्याच्या संपर्कात आल्याने गोगलगायी मरतात.

मिठाच्या द्रावणाची व परावर्तक फवारणी : लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रति १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे. बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद + १ किलो चुना १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना परावृत करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत.

गोगलगायनाशकाचा वापर करावा : गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड दाणेदार या गोगलगायनाशकाचा वापर करावा. कापसासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड २ किलो प्रति एकरी या प्रमाणात शेतात पसरून द्यावे, तर फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे. शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. मेटाल्डिहाईडचा वापर, जास्त तापमान व कमी आर्द्रता असताना अधिक प्रभावी दिसून येतो. जर हे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे. दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो गूळ आणि २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबविण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम २५ टक्के ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे आमिष शेतामध्ये ढिगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे. सदरील आमिषापासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे. वरील गोगलगायनाशक अथवा आमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा.

पावसानंतर नियमित शेताची पाहणी करावी : पाऊस पडल्यानंतर सलग ३ ते ५ दिवस सकाळी व सायंकाळी शेताची पाहणी करावी. प्रादुर्भाव सुरुवातीच्या अवस्थेत आढळल्यास नियंत्रण अधिक प्रभावी व कमी खर्चात करता येते. शंखी गोगलगायींचा प्रभावी बंदोबस्त करण्यासाठी केवळ एका शेतात उपाययोजना करून अपेक्षित यश मिळत नाही. ज्या गावात किंवा परिसरात प्रादुर्भाव दिसून येत आहे, त्या भागातील सर्व शेतकऱ्यांनी एकाच वेळी सामूहिकरीत्या व सुरुवातीपासूनच उपाययोजना केल्यास गोगलगायींची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊन पिकांचे नुकसान प्रभावीपणे टाळता येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८०० : फोर्ट विल्यम कॉलेज ची स्थापना.
१८९० : वायोमिंग अमेरिकेचे ४४ वे राज्य बनले. कॅलिफोर्नियातील डेथ व्हॅलीमध्ये तापमान १३४ अंश फूट (५७ अंश सेल्सिअस) पर्यंत वाढले, जे पृथ्वीवरील सर्वात उच्च तापमानाचे रेकॉर्ड आहे.
१९२३ : मुसोलिनीने इटलीतील सर्व राजकीय पक्षांवर बंदी घातली.
१९२५ : 'तास' या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना
१९२५ : अवतार मेहेरबाबा यांनी आपल्या मौनव्रताची सुरूवात केली. हे व्रत त्यांनी सलग ४४ वर्षे त्यांच्या मृत्यूपर्यंत पाळले.
१९२५ : तास या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना झाली.
१९४० : 'बॅटल् ? ऑफ ब्रिटन' या नावाने ओळखले जाणारे हवाईयुध्द सुरू. नाझी जर्मन विमानदलाने इंग्लंडवर प्रचंड मोठया संख्येने विमाने पाठवून बॉबफेक सुरू केली. इंग्लिश हवाईदलाने जर्मनांचा यशस्वी प्रतिकार केला.
१९४७ : ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट अॅटली यांच्या शिफारशीवरून मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले.
१९६२ : 'टेलस्टार-१' हा पहिला अमेरिकन दळणवळण उपग्रह यशस्वीपणे अंतराळात प्रक्षेपित
१९७३ : पाकिस्तानच्या संसदेने बांगलादेशला मान्यता दिली.
१९७३ : बहामाजला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९७८ : मॉरिटानियात लष्करी उठाव झाला.
१९७८: मुंबई येथे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ स्थापन करण्यात आले.
१९८३ : ब्रिटन मध्ये मार्गरेट थेचर यांची पंतप्रधान पदी पुन्हा नियुक्ती झाली.
१९९२ : मादक द्रव्यांच्या तस्करीबद्दल पनामाचे माजी राष्ट्राध्यक्ष मॅन्युएल नोरिएगा यांना फ्लोरिडात ४० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. नंतर ही शिक्षा कमी करुन ३० वर्षांची करण्यात आली.
१९९२ : संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या 'इन्सॅट २ ए' या उपग्रहाचे फ्रेंच गयानातील कोउरू येथून प्रक्षेपण
१९९२ : आर्वी येथील 'विक्रम इनसॅट भू-केंद्र' राष्ट्राला अर्पण
१९९५ : म्यानमारमधील लोकशाही चळवळीच्या प्रणेत्या आंग सान सू क्यी यांची ६ वर्षांच्या नजरकैदेतून बिनशर्त मुक्तता
१९९९ : जिनिव्हा या ठिकाणी आंतरराष्ट्रीय श्रम संमेलनाची सुरुवात करण्यात आली.
२००० : नायजेरियात एका फुटलेल्या तेलवाहिनीत स्फोट होऊन गळणारे तेल गोळा करण्यासाठी आलेले २५० जण जळुन ठार झाले.
२००० : विज्ञानप्रसारासाठीच्या कार्याबद्दल नेहरू तारांगणातर्फे दिला जाणारा 'मनुभाई मेहता पुरस्कार' शास्त्रज्ञ वि. ग. भिडे यांना जाहीर
२००३ : अमेरिकेच्या नासा या अंतराळ संस्थेने मंगळावर पाठवलेले मंगळ यान रोवर मंगळ ग्रहावर यशस्वी उतरले.
२००५ : भारत आणि श्रीलंका देशादरम्यान शिक्षण आणि समुदाय विकासाशी संबंधित दोन करारांवर हस्ताक्षर करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : वाय फाय प्रणालीचे जनक व अमेरिकन सर्बियन-अमेरिकन शोधक, इलेक्ट्रिकल अभियंता, मेकॅनिकल अभियंता निकोला टेस्ला यांचा जन्मदिन.
१८८८ : प्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक व शिक्षणमंत्री महात्मा हंसराज यांचे पुत्र बलराज भल्ला यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. भि. जोशी साहित्यिक (मृत्यू:)
१९१३ : पद्मा गोळे कवयित्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी १९९८)
१९१४ : सुपरमॅन हिरो चे सहनिर्माते जो शस्टर यांचा जन्म. (मृत्यू: ३० जुलै १९९२)
१९२१ : स्माईली चे निर्माते हार्वे बॉल यांचा जन्म. (मृत्यू: १२ एप्रिल २००१)
१९२३ : गुरूनाथ आबाजी तथा जी. ए. कुलकर्णी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते गूढकथालेखक (मृत्यू: ११ डिसेंबर १९८७)
१९३४ : पद्मभूषण विजेते जामखेड मॉडेल चे जनक डॉ. रजनीकांत आरोळे यांचा सुपे अहमदनगर येथे जन्म.
१९४० : लॉर्ड मेघनाद देसाई अर्थशास्त्रज्ञ आणि इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ लॉर्डस'चे सभासद
१९४३ : आर्थर अॅश अमेरिकन टेनिस खेळाडू (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९९३)
१९४५ : व्हर्जिनिया वेड इंग्लिश टेनिस खेळाडू
१९४९ : सुनील मनोहर तथा 'सनी' गावसकर क्रिकेटपटू व समालोचक
१९५० : 'बेगम' परवीन सुलताना पतियाळा घराण्याच्या शास्त्रीय गायिका
१९५१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व उत्तरप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री राजनाथ सिंह यांचा जन्मदिन.
१९८१ : राजीव गांधी खेल रत्न, अर्जुन पुरस्कार, व पद्मश्री पुरस्कार सास्न्मानीत पॅराअॅथलेटिक्स पटू देवेंद्र झाझड़िया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५९ : हेन्री (दुसरा) फ्रान्सचा राजा (जन्म: ३१ मार्च १५१९)
१९६९ : डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर इतिहासकार (जन्म: ३० मे १८९४)
१९७० : आईसलँडचे पंतप्रधान ब्यार्नी बेनेडिक्ट्सन यांचे निधन.
१९७१ : भिखारी ठाकूर भोजपुरी भाषेचे 'शेक्सपिअर' (जन्म: १८ डिसेंबर १८८७)
१९८९ : प्रभाकर ऊर्ध्वरेषे साम्यवादी विचारवंत व साहित्यिक (जन्म:)
१९९५ : डॉ. रामकृष्ण विष्णू तथा 'दादासाहेब' केळकर 'गरिबांचे डॉक्टर' म्हणून प्रसिद्ध, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अभिनव भारत मंदिराचे अध्यक्ष (जन्म:)
२००० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी वक्कम मजीद यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९०९)
२००५ : जयवंत कुलकर्णी (जन्म: ३१ ऑगस्ट १९३१)
२०१३ : भारतीय लेखक आणि शैक्षणिक गोकुलानंद महापात्रा यांचे निधन. (जन्म: २१ मे १९२२)
२०१४ : भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना आणि नृत्यदिग्दर्शक जोहरा सेहगल यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १९१२)

# वृक्षारोपण भविष्यातील पिढ्यांसाठी समृद्ध पर्यावरण निर्माणाचा संकल्प

## प्राचार्य डॉ. पंडित यांचे प्रतिपादन, मत्स्योदरी महाविद्यालयात ५०० हून अधिक वृक्ष लागवड

अंबड। प्रतिनिधी

वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम नसून भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प आहे. प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन केले तर पर्यावरण संवर्धनाची मोठी चळवळ उभी राहू शकते. वृक्षदिंडीसारख्या जनजागृती उपक्रमामुळे समाजात पर्यावरणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होतो, निसर्ग संवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधिक दृढ होते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित यांनी केले.



पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भावी पिढ्यांसाठी हरित वारसा जपण्याचा संकल्प करत अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयाने दिव्य मराठीच्या 'एक वृक्ष, एक जीवन' या राज्यव्यापी महाअभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला या वेळी ते बोलत होते. ७५ लाख वृक्ष लागवडीच्या संकल्पाचा भाग म्हणून बुधवारी सकाळी महाविद्यालय परिसरात वृक्षदिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. पंडित यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाने या अभियानात पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना जागवली. त्यानंतर महाविद्यालय परिसरात प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पोलिस कर्मचारी, विद्यार्थी यांनी विविध प्रजातींच्या ५०० हून अधिक वृक्षांची लागवड केली. या वेळी सर्वांनी वृक्षांचे संगोपन करण्याची सामूहिक शपथ घेतली. प्राचार्य डॉ. पंडित यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करावी. त्यांचे संगोपन करावे. ही काळाची गरज असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे परिसरात पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश पोहोचला. या वेळी उपप्राचार्य ज्ञानेश्वर उबाळे, प्रा.डॉ. राम रौनेकर, रासेयोचे डॉ. रविराज कटारे, प्रा. रवींद्र पैठणे, डॉ. लक्ष्मण गादगे, प्रा. जानकी कुतर्डीकर, बंडूसाहेब कनके, प्रा. संपत पवार, प्रा. दत्ता घोगरे, प्रा. विनोद जाधव यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिव्य मराठीने सुरु केलेल्या या उपक्रमाचे जिल्ह्यात विविध स्तरातून स्वागत होत असून मोठ्या संख्येने विविध संघटना, शाळा, महाविद्यालये यात सहभागी होत आहे. हरित भविष्यासाठी लोकचळवळ दिव्य मराठीच्या 'एक वृक्ष, एक जीवन' या राज्यव्यापी महाअभियानांतर्गत ७५ लाख वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे, वाढते प्रदूषण कमी करणे, भूजल पातळी वाढविणे, भावी पिढ्यांना हिरवेगार, समृद्ध पर्यावरण देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, नागरिक यांनी मोठ्या प्रमाणावर या अभियानात सहभागी व्हावे. वृक्ष लागवडीबरोबरच त्यांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चाकूरजवळील स्कूल बस उलटून २२ विद्यार्थी जखमी

### चालक काकांना फोन आला अन् गाडी उलटली



चाकूर। प्रतिनिधी

चाकूर तालुक्यातील राचन्नावाडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यालयाच्या स्कूल बसला बुधवारी (दि. ८) सकाळी ९ वाजेच्या सुमारास सांडोळजवळ अपघात झाला. चालकाला मोबाइलवर फोन आल्याने त्याचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यालगतच्या खड्ड्यात उलटली. या अपघातात बसमधील ३४ पैकी २२ विद्यार्थी किरकोळ जखमी झाले असून, सुदैवाने जीवितहानी न झाल्याने मोठा अनर्थ टळला. १२ विद्यार्थी पूर्णपणे सुखरूप आहेत.

ही बस (एमएच १२, पीक्यू ५१२०) कलकोटी, सांडोळ, महाडोळहून विद्यार्थ्यांना घेऊन राचन्नावाडीकडे जात होती. अपघाताची माहिती मिळताच सांडोळ आणि महाडोळ येथील नागरिक, चाकूर पोलीस, शिक्षकांनी घटनास्थळी धाव घेतली. आज शाळेत जाते वेळी गाडीवर दरोजचे ड्रायव्हर काका नसुन दुसरे ड्रायव्हर होते.

कांकाना सारखांच फोन येत होता.सांडोळ गावाच्या थोडे पुढे गाडी गेली असता काकांना फोन आला अन्? कांकांनी स्टेरींग एकाच बाजूला ओढली असता गाडी रस्त्याच्या बाजूला जावून उलटली. गाडी उलटताच एकदम भिती वाटली व गाडीत एकाच वेळी आरडाओरड झाली.अनेकांच्या डोक्याला,हाताला,पाठीत मार लागला आहे.

# महिला आरोग्य, डेंग्यू प्रतिबंध, लसीकरणावर जनजागृती

### आरोग्यदायी गाव घडवण्यासाठी मंठा पंचायत समितीत तालुका समन्वय बैठक उत्साहात



मंठा। प्रतिनिधी

ग्रामीण भागात आरोग्यदायी वातावरण निर्माण करून प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाला मंठा तालुक्यात अधिक गती देण्यात येणार आहे. पंचायत समिती येथे आयोजित तालुका समन्वय बैठकीत जुलै महिन्यात राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक उपक्रमांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला.

एप्रिल २०२६ पासून मंठा तालुक्यात सुरू असलेल्या या अभियानांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये आरोग्य संपन्न गाव समितीच्या नियमित बैठका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. महिलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी, लिंग-आधारित हिंसाचार प्रतिबंधाबाबत जनजागृती, 'डेंग्यू प्रतिरोध महिना' साजरा करणे. डेंग्यूसह किटकजन्य आजारांविरोधात प्रतिबंधात्मक उपाययोजना. जलजन्य आजारांविषयी जनजागृती. या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला. याशिवाय जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त पात्र दाम्पत्यांचे समुपदेशन करून कुटुंब नियोजनाबाबत मार्गदर्शन करणे, सर्व गर्भवती माता व बालकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, नियमित लसीकरणाला गती देणे, नागरिकांमध्ये आरोग्य शिक्षणाचा प्रसार करणे. ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. गटविकास अधिकारी विनय पवार यांनी नागरिकांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून शासकीय आरोग्य योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. बैठकीस तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगन्नाथ कुंडकर, बालविकास प्रकल्प अधिकारी मुकुंदराव घोडके, तालुका विस्तार अधिकारी हरिभाऊ ताठे, वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी निलवर्ण, तालुका आरोग्य सहाय्यक सुजीत वाघमारे, आरोग्य सेवक शरद खाडे, अक्षय पाथरीकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जुलैभर आरोग्यविषयक उपक्रमांना गती 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जुलै महिन्यात प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये आरोग्य संपन्न गाव समितीच्या बैठका आयोजित करण्यात येणार आहेत. महिलांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी, डेंग्यू व इतर किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी 'डेंग्यू प्रतिरोध महिना', जलजन्य आजारांविषयी जनजागृती, जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त पात्र दाम्पत्यांचे समुपदेशन, गर्भवती माता व बालकांना दर्जेदार आरोग्य सेवा, नियमित लसीकरणाला गती. नागरिकांमध्ये आरोग्य शिक्षणाचा प्रसार. या उपक्रमांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

# हिंगोलीसह परभणी-नांदेडमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के

### मध्यरात्री जमीन हादरल्याने नागरिकांची सुरक्षित ठिकाणी धाव

हिंगोली । प्रतिनिधी

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये मध्यरात्री भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले असून, यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हिंगोली, परभणी आणि नांदेड या तिन्ही जिल्ह्यांमधील अनेक भागांत मध्यरात्री १ वाजून ३७ मिनिटांनी भूकंपाचे हे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.७ इतकी नोंदवण्यात आली आहे. हिंगोलीतील शिरळी परिसरात ४.६ रिश्टर स्केलची नोंद झाली आहे. या भूकंपाच्या धक्यांमुळे नागरिकांनी रात्र जागून काढली.

नांदेड शहरातील तरोडा नाका, मालेगाव, कावरानगर, निळा रोड या भागातील नागरिकांना भूकंपाचे धक्के जाणवले. हिंगोली जिल्ह्यात मागील काही वर्षापासून भूकंपाची मालिकाच सुरु आहे. सतत होणाऱ्या भूकंपामुळे नागरीक भयभित झाले आहेत. गुरुवारी ता. ९ पहाटे १ वाजून ३७ मिनिटांनी ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप झाला असून शिरली (ता. वसमत) हे भूकंपाचे केंद्रबिंदू असून खोली १० किलोमिटर आहे. त्यानंतर दुसरा धक्का २.१५ मिनिटांनी ३.६ रिश्टर स्केल, २ वाजून १७ मिनिटांनी ३.९ रिश्टर स्केल, तर ३ वाजून २३ मिनिटांनी ४.१ रिश्टर स्केल भूकंपाची नोंद झाली असूनत त्याचे केंद्रबिंदू काकडदाभा (औंढा नागनाथ) असल्याचे स्पष्ट झाले आहे. या भूकंपाचे धक्के वसमत, हिंगोली, कळमनुरी व औंढा नागनाथ तालुक्यात अधिक तिव्रतेने जाणवले आहे. ग्रामीण भागातील गावकऱ्यांनी रात्र जागून काढली आहे. आमदरी येथे एका घराची भिंत कोसळली असून १० ते १२ घरांना तडे गेले आहेत.

तसेच पांगरा शिंदे गावात ५० ते ६० घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत. या भागात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले आहेत. हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये. आपत्कालीन परिस्थितीशी सामना करण्यास प्रशासन सज्ज असून स्थानिक यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास ठेऊन नये आपत्कालीन परिस्थिती किंवा नुकसान आढळल्यास तातडीने प्रशासनाशी संपर्क साधावा. नागरिकांनीही समाजात भितीचे वातावरण निर्माण होईल अशा प्रकारचे संदेश समाज माध्यमातून पोस्ट करू नये.

# उमरग्यात २३ जणांनी दिली वीरशैव सिद्धांत प्रबोध, प्रवीण, पंडित परीक्षा

उमरगा। प्रतिनिधी

वीरशैव सिद्धांत प्रबोध परीक्षा वीरशैव धर्माचे तत्त्वज्ञान व शिकवणूक समजून घेण्यासाठी घेतली जाते. ही परीक्षा वीरशैव धर्म संस्थापक व प्रमुख विचारसरणीवर आधारित असते. या परीक्षेत वीरशैव धर्माचे मूळ तत्त्वज्ञान, शैवगम व वीरशैव धर्माचे विचारांवरतीच प्रश्न विचारले जातात. एकूण २३ परीक्षार्थींनीही परीक्षा दिली. श्री काशी जगद्गुरू वीरशैव विश्वाराध्य विद्यापीठ जंगमवाडी मठ वाराणसी यांच्या वतीने वीरशैव सिद्धांत प्रबोध,वीरशैव सिद्धांत प्रवीण व पंडित परीक्षा रविवारी (दि. ५) उमरगा येथील वीरशैव सभागृह चौकी मठ येथे घेण्यात आली. वीरशैव सिद्धांत प्रवीण परीक्षेसाठी १८ परीक्षार्थी व वीरशैव सिद्धांत प्रबोध परीक्षा एक परीक्षार्थींनी तर पंडित परीक्षा चार जणांनी दिली. सकाळी ११ ते दोन दरम्यान ही परीक्षा दिली.

या वेळी परीक्षा केंद्र संचालक सरीता उपासे, मीनाक्षी शिवानंद माशाळकर यांनी काम पाहिले. या परीक्षेच्या यशस्वितेसाठी वीरशैव महिला मंडळ अध्यक्षा राजश्री शिवशंकर माळगे, मायादेवी बसवराज स्वामी, प्रतिभा जगन्नाथ माशाळकर आदींनी परिश्रम घेतले. परीक्षा पर्यवेक्षक म्हणून सरिता उपासे-वैरागकर यांनी काम पाहिले. या परीक्षेसाठी मीनाक्षी माशाळकर, राजश्री माळगे, माया स्वामी, प्रतिभा माशाळकर, सुषमा दामशेट्टी, सविता व्हंडरे, छाया माशाळकर, सोनी खसगे, शीतल खसगे, प्रमिला माळगे, पुष्पा हेबळे आदी सहभागी झाले होते. शिव हे परम तत्त्व, तो जगाचा सार, धर्माची विचारसरणी व इतिहास माहिती असावा या वेळी उपासे म्हणाल्या, वीरशैव धर्माचे प्रमुख तत्त्वज्ञान वीरशैव धर्मात शिव हे परम तत्त्व आहे, तो जगाचा सार आहे, जगाचा आत्मा आहे. वीरशैव धर्माचे धर्मग्रंथ शैवगम नुसार, शिव हा परम तत्त्व आहे. या अंतर्गत १८ शैवगम येतात. परीक्षेच्या तयारीसाठी वीरशैव धर्माचे तत्त्वज्ञान व शैवगम यावर आधारित पुस्तके व साहित्य वाचणे आवश्यक आहे. वीरशैव धर्माची प्रमुख विचारसरणी व इतिहासावर आधारित माहिती असणे आवश्यक आहे.

# ज्ञानोबा-माऊलींच्या जयघोषात शिवेश्वर देवस्थानची पायी दिंडी पंढरीकडे रवाना

### यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष, १८ दिवसांचा पायी प्रवास

शेलगाव। प्रतिनिधी

टाळ-मृदुंगाचा निनाद आणि ज्ञानोबा-माऊलीच्या जयघोषात शेलगावनजीकच्या वाकी येथील श्रीक्षेत्र शिवेश्वर देवस्थानच्या पायी दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. रिमझिम पावसाच्या साक्षीने भाविकांच्या अभूतपूर्व उत्साहात ७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता हा पालखी सोहळा मार्गस्थ झाला.

शिवेश्वर देवस्थानचे उत्तराधिकारी नामदेव महाराज पल्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे यंदा रौप्यमहोत्सवी (२५ वे) वर्ष आहे. सकाळी नामदेव महाराजांच्या हस्ते विधीवत पालखी पूजन झाल्यानंतर वाकी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महिलांनी ठिकठिकाणी दिंडीचे स्वागत करून दर्शन घेतले. पुढे नेवपूर येथे ग्रामस्थांनी पालखीचे जोरदार स्वागत केले व वारकऱ्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

हा सोहळा १८ दिवसांच्या पायी प्रवासानंतर २५ जुलै रोजी पंढरपूर येथील नारायणदेव धर्मशाळेत पोहोचेल. यावेळी जिल्हा परिषद सदस्य अर्जुन पाटील, पंचायत समिती सदस्य प्रवीण गोरे, चेअरमन राजू पवार, सरपंच ज्ञानेश्वर पल्हाळ, काकासाहेब जंजाळ, सरपंच पुंडलिक जंजाळ, पंढरीनाथ महाराज जंजाळ, विजयकुमार वाघमारे यांच्यासह परिसरातील वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकतच्या पाण्यावर जगवली सिमला मिरची

## बाजारात मात्र १९ रुपयांचा भाव, पिंपळगाव रेणुकाई बाजारातील दरघटीने शेतकरी आर्थिक संकटात

पिंपळगाव। प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथील जिल्ह्यातील प्रमुख मिरची बाजारात यंदा मिरचीला अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शिमला १८, जेव्लरी ३०, पिकेटोअर २०, बळीराम १७, तर बारीक मिरची ५५ रुपये किलोप्रमाणे विक्री होत आहे. मिरचीच्या उत्पादनासाठी केलेला लागवड खर्च तर दूरच, वाहतूक खर्चही निघणे कठीण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मोठ्या अपेक्षेने मोठा खर्च करून विकतच्या पाण्यावर उभे केलेले पीक विक्रीसाठी बाजारात आणल्यानंतर मिळणारा मातीमोल दर पाहून शेतकऱ्यांचा भ्रमनिरास होत आहे.

मागील महिनाभरापासून पिंपळगाव रेणुकाई येथील मिरची बाजारात परिसरातील अनेक गावांतील शेतकरी मोठ्या प्रमाणावर मिरची विक्रीसाठी दाखल होत आहेत. उन्हाळ्यातील तीव्र उष्णता, पाण्याची टंचाई, वाढता उत्पादन खर्च यावर मात करत अनेक शेतकऱ्यांनी विकतचे पाणी घेऊन मिरचीचे पीक जोपासले. खत, बियाणे, औषधे, मजुरी, सिंचन यावर लाखो रुपयांचा खर्च करून दर्जेदार उत्पादन घेतले. मात्र बाजारात आवक सुरू होताच भावात मोठी घसरण झाली. शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पन्न पडत नसल्याचे वास्तव आहे. पिंपळगाव रेणुकाई हे मराठवाड्यातील मिरचीचे महत्त्वाचे बाजारपेठ केंद्र म्हणून ओळखले जाते. या बाजारात महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, मध्य प्रदेशातील व्यापारीही मिरची खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे येथे दर चांगले मिळतील, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा असते. परंतु यंदा बाजारात मिरचीची आवक



मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे कारण पुढे करत व्यापाऱ्यांकडून अत्यल्प दराने मिरचीची खरेदी केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. सध्या मिळणाऱ्या दरामुळे अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याची स्थिती आहे. बाजारात मिरची घेऊन जाण्यासाठी लागणारा वाहतूक खर्च, हमाली, बाजार समितीचे शुल्क, इतर खर्च वजा केल्यानंतर हातात अत्यल्प रक्कम उरते. शेतकरी हवालदिल झाला आहे. परिणामी अनेक शेतकरी मिरचीची तोडणीच बंद करत आहेत. शेतातील पीक उपटून टाकण्याचा पर्याय स्वीकारत आहेत. दुसऱ्या पिकांकडे वळत आहेत. असे चित्र परिसरात दिसून येत आहे. यावर्षी भोकरदन तालुक्यात सुमारे सात हजार हेक्टर क्षेत्रावर विविध प्रकारच्या मिरचीची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये शिमला, पिकेटोर, जेव्लरी, तेजाफोर, तलवार, लालपरी, ४१२, सायबा तसेच इतर सुधारित वाणांचा समावेश आहे. सुरुवातीला हवामान अनुकूल असल्याने उत्पादनही चांगले झाले. मात्र उत्पादन वाढले. बाजारातील मागणीच्या तुलनेत आवक अधिक झाली. त्याचा थेट परिणाम दरावर झाला. परिणामी शेतकऱ्यांच्या आशाआकांक्षांवर पाणी फिरले आहे. शेतकऱ्यांच्या मते, मिरची उत्पादनासाठी एकरी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते. पाणीटंचाईच्या परिस्थितीत टँकर किंवा विहिरीतील पाणी विकत घेऊन सिंचन करावे लागते. याशिवाय वेळोवेळी फवारण्या, खतांचा वापर, मजुरीचा खर्चही मोठा असतो. त्यामुळे बाजारात किमान उत्पादन खर्च तरी निघेल, अशी अपेक्षा असते. मात्र सध्याचे दर पाहता अनेकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. कर्जाचा बोजाही वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरांवर नियंत्रण आवश्यक शेतकऱ्यांनी शासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. मिरची उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा. यासाठी बाजारातील दरांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या मनमानीला आळा घालणे गरजेचे आहे. आवश्यक असल्यास हस्तक्षेप करावा. हमीभावासारखी यंत्रणा उभी करावी. प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन द्यावे. अशी मागणी केली जात आहे.

# आदिशक्ती संत मुक्ताई पालखी मार्गावरील अस्वच्छता व खड्डे तातडीने दुरुस्त करा!

बीड । प्रतिनिधी

आदिशक्ती संत मुक्ताईंची पालखी उद्या बीड शहरात दाखल होत असून, पालखी मार्गावरील अस्वच्छता, कचऱ्याचे ढीग आणि ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वारकरी व भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे पालखी मार्गाची तातडीने स्वच्छता करून रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड आणि जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

आदिशक्ती संत मुक्ताईंची पालखी जालना रोडमार्गे बीड शहरात प्रवेश करते. त्यानंतर सुभाष रोड, माळवेस, धोंडीपुरा, बलभीम चौक आणि जुना बाजार मार्गे पुढील प्रवास करते. बीडमध्ये संत मुक्ताई आणि आजोबा गोविंदपंत यांची भेट होत असल्याने या पालखी सोहळ्याला विशेष धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. पालखीचा दोन दिवसांचा मुक्काम बीडमध्ये असतो.



## मुख्याधिकारी नगरपरिषद व जिल्हाधिकाऱ्यांकडे डॉ. गणेश ढवळे यांची निवेदनाद्वारे मागणी

मात्र यंदा पालखी मार्गावर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पालखीच्या दर्शनासाठी हजारो वारकरी आणि भाविक शहरात येत असल्याने या परिस्थितीमुळे अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पालखी आगमनापूर्वी संपूर्ण मार्गाची स्वच्छता, खड्ड्यांची दुरुस्ती आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी डॉ. ढवळे यांनी केली आहे.

पालखीचा प्रमुख मार्ग जालना रोड फ सुभाष रोड फ माळवेस फ धोंडीपुरा फ बलभीम चौक फ जुना बाजार मार्गे आदिशक्ती संत मुक्ताई पालखी पुढील प्रवास करते. याच मार्गावर सध्या मोठ्या प्रमाणात कचरा व रस्त्यांवरील खड्ड्यांची समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

डॉ. ढवळे यांची मागणी पालखी आगमनापूर्वी संपूर्ण मार्गाची विशेष स्वच्छता मोहीम राबवून रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, प्रकाशव्यवस्था आणि इतर आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून वारकरी व भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शनाची व्यवस्था करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# जिवे मारण्याच्या उद्देशाने विषारी औषध पाजले; पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील वैद्यवडगाव येथील शेतकरी रामकिसन दगडुबा राऊत यांना रस्त्याच्या वादातून तिघांनी संगनमत करून मारहाण करत जबरदस्तीने विषारी औषध पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर तक्रार पोलिसांकडे नोंदवली असताना सुद्धा या प्रकरणी गुन्हा दाखल होऊनही संबंधित आरोपी अद्याप अटकेबाहेर असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

फिर्यादीच्या जबाबानुसार, २३ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास ते शेतात जात असताना रस्त्याच्या जुन्या वादातून मदन राऊत, गोविंद राऊत आणि बालाजी राऊत यांनी त्यांना अडवून शिवीगाळ केली. त्यानंतर तिघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यानंतर आरोपींनी जिवे मारण्याच्या उद्देशाने जबरदस्तीने विषारी औषध पाजल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या घटनेनंतर रामकिसन राऊत बेशुद्ध झाल्याने त्यांना प्रथम उपचारासाठी हलविण्यात आले आणि नंतर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी पोलिसांसमोर सविस्तर जबाब नोंदवून आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली. दरम्यान, या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. आरोपींना तातडीने अटक करून कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दोन वेळा लेखी निवेदनही सादर केले असल्याचे समोर आले आहे. मात्र, त्यानंतरही आरोपींना अटक न झाल्याने फिर्यादीसह त्यांच्या कुटुंबीयांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंद असूनही आरोपी मोकाट फिरत असल्याचे निवेदनातून नमूद करण्यात आले आहे. या याप्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# बीड शहरासहित जिल्ह्यातील दोन लाख बोगस मतदारांची नावे कमी होणार -सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी



सध्या जिल्ह्यात एसआयआर म्हणजे मतदार यादी पुनर्रचनेचे काम सुरू आहे. मतदार यादीतील अपात्र, मृत, स्थलांतरीत तसेच एकापेक्ष अधिक ठिकाणी नावे असलेल्या मतदारांची अचूक नोंद करण्यासाठी निवडणुक आयोगाने ही मोहिम हाती घेतली आहे. यामुळे बीड शहरासह जिल्ह्यातील दोन लाख बोगस मतदारांची नावे कमी होणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी म्हटले आहे.

जिल्हाप्रमुख मुळूक म्हणाले की, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मतदार यादीत मृत, स्थलांतरित, एकापेक्षा अधिक ठिकाणी नोंद असलेले तसेच अपात्र मतदार असल्याच्या तक्रारी अनेक वर्षांपासून होत आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सुरू केलेली एसआयआर प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. बीड शहरासह जिल्ह्यातील सुमारे दोन लाख बोगस मतदारांची नावे मतदार यादीतून कमी होण्याची शक्यता असून, सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेमुळे निवडणूक व्यवस्था अधिक पारदर्शक होईल आणि लोकशाही अधिक बळकट होईल.

बोगस मतदारांची नावे कमी झाल्यास प्रत्येक पात्र मतदाराच्या मताला योग्य न्याय मिळेल आणि निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास आणखी दृढ होईल, जिल्हाप्रमुख मुळूक यांनी शिवसैनिकांना आपल्या गावात, वॉर्डात आणि परिसरात नागरिकांना एसआयआर प्रक्रियेची माहिती देण्याचे आवाहन केले.

# गेवराई तालुक्यात पंधरा वर्षीय मुलीचा थांबवला बालविवाह

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील एका गावात पंधरा वर्षीय मुलीचा बालविवाह गुरुवार, दि ९/७/२६ रोजी सकाळी अकरा वाजता ११ ते १२ दरम्यान होणार आहे माहिती मिळाल्यानंतर मादळमोही पोलीस ग्रामविकास अधिकारी व तत्त्वशील कांबळे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड तथा अधिकारमित्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील सर्वांना मिळून बालविवाह होणाऱ्या ठिकाणी मुलीच्या घरी जाऊन माहिती घेतली असता आई-वडिलांशी व आजी आजोबा नातेवाईकाशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की आम्ही मुलीचा बालविवाह करणार नाही आज कुंकू टिळ्याचा कार्यक्रम आहे असे त्यांनी सांगितले त्यावेळी मुलीचे आई वडील आजी-आजोबा व इतर नातेवाईक उपस्थित होते त्या सर्वांना बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ यानुसार कुंकू टिळा साखरपुडा व बालविवाह इत्यादी बालकाच्या बालविवाह बाबतीत होणाऱ्या प्रत्येक गोष्टी ह्या कायद्यानुसार गुन्हा असून आपणास कोणताही कार्यक्रम करता येणार नाही असे सांगितले त्यानुसार मुलीच्या आई-वडिलांनी सदर कार्यक्रम रद्द करण्याचे ठरवले व मुलीचे आई-वडील ऊस तोडणी ला जातात असे त्यांनी सांगितले व त्यामुळे आम्हाला सहा महिने स्थलांतरित राहावे लागते त्यामुळे समस्या निर्माण होते असे त्यांनी सांगितले व सदरील मुलगी नुकतीच दहावी पास झाली असून तिला ७८% मिळाले आहेत असे समजल्यानंतर तिला पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी शासनाच्या विविध योजनेविषयीची माहिती व मुलींचे वस्तीग्रह विषयीची माहिती मुलीचे आई-वडील नातेवाईक व आजी-आजोबा यांना देण्यात आल्यानंतर मुलीच्या आजोबांनी सदरील मुलीचे शिक्षण पूर्ण करण्याकरिता शासनाच्या वतीने मुलीच्या वस्तीगृहाची शिक्षणाची सोय करावी अशी विनंती केली त्यानुसार त्यांना स्व गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या वतीने संत भगवान बाबा ऊसतोड कामगार मुलींचे वस्तीग्रह या ठिकाणी पुढील शिक्षणाची सोय मोफत करून देऊ असे सांगितल्यानंतर ते मुलीचे पुढचे शिक्षण करण्यासाठी तयार झाले प्रशासन फक्त बालविवाह थांबवणे एवढ्या पुरतेच मर्यादित नसून सदरील बालिकांचे पुनर्वसन करणे व त्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत आहे याकरिता बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली बालविवाह थांबवलेल्या प्रत्येक बालकाचा पुनर्वसनाचा आढावा घेतला जात असून ऊसतोड कामगार व इतर कामासाठी स्थलांतरित होत असलेल्या कामगारांनी अथवा त्यांच्या पाल्यांनी आपल्या बालकांच्या ◀◀ पान ३ वर

# सायबर गुन्ह्यातील दोन फिर्यादीस पाच लाख रुपये मिळवून देण्यात ॲड. किशोर खेडकर यांना यश

बीड । प्रतिनिधी

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच दोन सायबर गुन्ह्याच्या फिर्यादीस मा.०५ वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड यांनी दी २९/०६/२०२६ रोजी सदरील की.फो क्र : ५५२/२०२६ व दि ३०/०६/२०२६ की.फो क्र ५५३/२०२६ या प्रकरणात ड. किशोर खेडकर यांनी दोन्ही फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून पाच लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.फिर्यादीचे खाते देखील सुरळीत चालू करून देण्यात आले आहे. या संबंधित प्रकरणात आज दि ०९/०७/२०२६ रोजी सुनावणीत मा. न्यायालयाने आदेश दिले.



सदर प्रकरणात फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान व न्यायालयीन प्रक्रियेत ड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून फिर्यादीस पाच लाख रुपये देण्याचे आदेश दिले.

या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. या कामी ड.विराट बारगजे याचे सहकार्य लाभले ड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# संपादक राजेंद्र होळकर यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी

दै. अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर, संजय होळकर यांच्या मातोश्री द्वारकाबाई बाबुराव होळकर (वय ७६) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी सायंकाळी राहत्या घरी निधन झाले.



गेल्या काही महिन्यांपासून त्या आजारी होत्या. उपचारा दरम्यान त्यांची गुरुवारी प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिववार शुक्रवार दि. १० जुलै रोजी सकाळी ९ वाजता भगवानबाबा प्रतिष्ठाण जवळील स्मशानभूमी, बार्शी रोड, बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# माजी नगरसेवक सय्यद एजाज यांच्या प्रयत्नाने तय्यब नगरला मिळाला बसचा थांबा

गेवराई / वार्ताहर

गेवराई शहरातील अलीकडच्या काळात झपाट्याने वाढ होत असलेला तय्यब नगर भाग आणि त्या परिसरातील लोकांना एसटी बस मधून प्रवास करण्यासाठी लांब मोंढा नाक्यावर जाऊन राज्य परिवहन महामंडळाची लालपरी अर्थात एसटी बस पकडावी लागत होती यामध्ये लोकांचं आर्थिक नुकसान होऊन मानसिक तणावाला सामोरे जावे लागत होते त्यांची ही परवड थांबवण्यासाठी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी पुढाकार घेऊन तय्यब नगर वासियांना मोठा दिलासा देत बस विनंती थांबा मंजुर करून घेतला आहे. या एसटी महामंडळाच्या बस विनंती थांबा नामफलकाचे उद्घाटन तालुक्याचे लोकनेते बाळराजे पवार यांच्या हस्ते आज दिनाक ८ जुलै बुधवार रोजी करण्यात आले. यावेळी बस थांबा जवळ लोकांना बसण्यासाठी एक छोटसं ◀◀ पान ३ वर




# गेवराईच्या अचानक नगरात पोलिसांनी मारला वेश्या व्यवसायावर अचानक छापा

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील 'अचानक नगर' भागात सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर 'अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने' धाडसी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन पीडित महिलांची सुटका केली असून, दोन महिला आरोपींविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांना ८ जुलै रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, गेवराईतील अचानक नगर येथील एका घरात बाहेरून महिलांना बोलावून वेश्या व्यवसाय चालवला जात आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी 'डमी ग्राहक' तयार केला. डमी ग्राहकाने महिला एजंटकडे वेश्यागमनासाठी विचारणा केली असता, तिने १००० रुपयांची मागणी केली. ठरल्याप्रमाणे पैसे दिल्यानंतर डमी ग्राहकाने पोलीस पथकाला इशारा केला.




पोलीस पथकाची कारवाई

इशारा मिळताच पोलीस निरीक्षक निलेश केळे आणि त्यांच्या पथकाने छापा मारला. चौकशीदरम्यान, मुख्य महिला आरोपी नागरबाई लक्ष्मण हातागळे (रा. रामतीर्थ, बीड) हिने गुन्ह्याची कबुली दिली. तसेच, पीडित महिलांनी सांगितले की, आरोपी नागरबाई हातागळे आणि घरमालकीण शांताबाई सतीश पवार या त्यांना वेश्या व्यवसायासाठी जबरदस्तीने बोलावून घेत असत आणि त्यांच्या कमाईतील मोठा हिस्सा स्वतः लाटत असत. पोलिसांनी घटनास्थळावरून ५०० रुपयांच्या दोन नोटा (डमी ग्राहकाच्या) आणि २१ निरोध जप्त केले आहेत.

आरोपींवर गुन्हा दाखल

पीडित महिलांचे शोषण करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वेश्या व्यवसाय चालवल्याप्रकरणी नागरबाई हातागळे आणि शांताबाई पवार यांच्यावर अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ च्या विविध कलमांनुसार गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश केळे, सपोनि जनाबाई सांगळे आणि '-क्ढण' बीडच्या पथकाने केली. पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत. ◀◀ पान ३ वर

# युसूफवडगांवमध्ये अवैध धंद्याच्या सुळसुळाट नंतर भुरट्या चोरांचा धुमाकुळ; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव परिसरात अवैध धंद्यांची चर्चा सुरू असतानाच आता भुरट्या चोरांनीही शेतकऱ्यांना लक्ष्य केले आहे. गेल्या दीड महिन्यात तळ्याकडील परिसरात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत सुमारे १५ ते २० शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत मोटारींचे वायर चोरी केले, तर काही शेतकऱ्यांच्या संपूर्ण मोटारीच लंपास केल्या. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे शेतकरी वर्गात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मांजरा तळ्याकडील परिसरातील या चोरीच्या घटनांमध्ये शेतकऱ्यांचे अंदाजे दीड ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे बोलले जात आहे. आधीच शेती परवडेनाशी झालेली असताना सिंचनासाठी आवश्यक असलेले वायर व मोटारी चोरीला गेल्यामुळे अनेक शेतकऱ्यांसमोर पिकांना पाणी देण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही शेतकऱ्यांना नव्याने वायर आणि मोटारी बसविण्यासाठी मोठा आर्थिक भार सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, एक-दोन नव्हे तर सलग अनेक चोरीच्या घटना घडूनही चोरटे अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.परिणामी, अनेक शेतकरी रात्रभर शेतात मुक्काम करून आपल्या मालमत्तेची राखण करण्यास भाग पडत आहेत.वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे युसूफवडगांव परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या भुरट्या चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे.

# डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचा आयएमए बीडकडून तीव्र निषेध - डॉ. गिते

बीड । प्रतिनिधी

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर झालेल्या अमानुष हल्ल्याचा इंडियन मेडिकल असोसिएशन (खच-) बीड शाखेतर्फे तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे.



रुग्णसेवा बजावत असताना डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले अत्यंत निषेधार्ह असून अशा घटनांमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण होते. अशा प्रकारच्या हिंसक घटनांमुळे रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होऊन समाजाचेही मोठे नुकसान होते. आयएमए बीडने राज्य शासन व पोलीस प्रशासनाकडे संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची, दोषींना तातडीने शिक्षा करण्याची तसेच राज्यातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. वैद्यकीय व्यावसायिकांवरील कोणत्याही प्रकारची हिंसा कदापि सहन केली जाणार नाही. डॉक्टरांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलावीत, असे आवाहन आयएमए बीडतर्फे करण्यात आले आहे.

# एसआयआर-बीएलओ कामाच्या दबावाविरोधात वडवणीतील शिक्षक एकवटले

**धमक्या नव्हे, सहकार्य द्या; तहसीलदारांना निवेदन सादर,अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याचीही मागणी**

**वडवणी । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या एसआयआर आणि बीएलओ या कामाच्या वाढत्या ताणामुळे शिक्षकांचा जीव मेटाकुटीला आला आहे. मंगळवारी उपळी याठिकाणी हे काम करत असतांना तणावाने एक शिक्षक कर्मचारी अक्षरशः जागीच बेशुध्द होवून पडला. नशीब वेळीच उपचार भेटल्यानंतर आता त्यांची प्रकृती स्थिर आहे. परंतू शिक्षकांना हे काम करतांना येणाऱ्या अडचणी, जाचक अटी, मानसिक त्रास तसेच अन्यायकारक कायदेशीर कारवाईच्या धमक्यांविरोधात वडवणी तालुक्यातील विविध शिक्षक संघटना व शिक्षक बांधव एकवटले असून, त्यांनी दि.८ बुधवारी तहसीलदार वडवणी यांना याबाबत सविस्तर लेखी निवेदन सादर केले आहे.



या निवेदनात शिक्षकांनी म्हटले आहे की, शासकीय व राष्ट्रीय उपक्रमांमध्ये आजवर शिक्षक नेहमीच जबाबदारीने सहभाग नोंदवत आलेले आहेत. मात्र सध्या सुरु असलेल्या एसआयआर आणि बीएलओ कामामध्ये अनेक तांत्रिक, प्रशासकीय व व्यावहारिक अडचणी येत आहेत. कामाच्या वाढत्या दबावामुळे शिक्षकांमध्ये भिती व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, किरकोळ त्रुटी झाल्यास वारंवार नोटीसा देणे, थेट गुन्हे दाखल करण्याची किंवा कायदेशीर कारवाई करण्याची भिती दाखवली जात असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे. शिक्षकांनी निदर्शनास आणून दिले की, नियमित अध्यापन, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची जबाबदारी, विविध शालेय उपक्रम तसेच प्रशासकीय कामे सांभाळतांना अगोदरच नाकीनऊ आले असतांना आता या अतिरिक्त एसआयआर व बीएलओ कामाचा मोठा भार त्यांच्यावर पडत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होण्याची शक्यता नव्हे तर गंभीर परिणाम झालेला असून, शिक्षकांवर मानसिक व शारीरिक ताण वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26